

# भगवान निळे | सांगायलाच हवंय, असं नाही...



(तुला सांगण्यासारखे
तू काही समजण्याचे
एकमेकांना सांगण्यासमजण्याचे
दिवस सरले आहेत का ?

मी आपलं भाकरीबद्दल बोलतोय
आणि तू
धर्माबद्दल बोलायचं थांबतच नाहीस...
आपण नेमके कुठे चाललोय ?

सृजन प्रकाशन

# सांगायलाच हवंय असं नाही...

भगवान निळे

प्रकाशन

Sangayalach havay as nahi (Poetry) (Bhagwan Nile)
प्रकाशन : आठवे

© सरिता चाळके-निळे
२३/३२ विजयनगरी ॲनेक्स,
घोडबंदर रोड, वाघबीळ नाका,
ठाणे (पश्चिम) : ४०० ६१५ ■ भ्रमणध्वनी : ८०९७८५३३३८

**प्रकाशिका**
मिहिका वि. जाधव
सृजन प्रकाशन
गोमती, एफ-२, २:४, सेक्टर ८ बी,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
भ्रमणध्वनी : ८९७६६६९३७३, ९७६९६६८३६९
srujanprakashan@gmail.com

प्रथम आवृत्ती : नोव्हेंबर २०१५

मुखपृष्ठ । मांडणी : सतीश भावसार ■ भ्रमणध्वनी :९६१९०४३६४८

मलपृष्ठावरील छायाचित्र : प्रीतम शेलार

अक्षरजुळणी : स्मिता भावसार

मुद्रक : मौज प्रिंटींग ब्युरो, मुंबई

वितरक : मनोविकास बुक स्टॉल, आकाशवाणी आमदारनिवास, चर्चगेट, मुंबई
साहित्य प्रसार केन्द्र, बर्डी, नागपूर
साधना मीडिया सेन्टर, पुणे
कौसल्या प्रकाशन, औरंगाबाद
पिपल्स बुक हाऊस, फोर्ट, मुंबई

मूल्य : ₹ १२०

ई प्रकाशक :

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

ई प्रकाशन : १७ मे २०१६

©esahity Pratishthan®2016

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

तुमचं
तुम्हालाच...



प्रसन्न अन् उबदार मऊ सावळेपणा पसरलेला... मागनं पांढराशुभ्र धबधबा कोसळतोय. गारवा थंड हिरवा शांत, नीरव न् अशात छान मित्राच्या खांद्यावर हात टेकून आश्वस्तपणे आपल्या आयुष्याचा फोटो काढावा तशी भगवानची कविता!

**-मलिका अमर शेख**

---

थेट अनुभवाला भिडणारी अभिव्यक्ती, स्वच्छ प्रतिमाविरहित शब्दकळा, विशेषत: स्त्रीच्या करुणामय अस्तित्वाची पारदर्शक ठसठसणारी नस पकडण्याची अद्‌भुत किमया ही भगवान निळे यांच्या कवितांची अस्सल सारिणी आहे.

वीणा तर निनादते आहे नि विनाकारण शब्द तडफडतात समेवर अशा आभासांची मूर्त लकेर काळजाला चिरत जाते.

मी खूप अस्वस्थ होतो त्याच्या कविता वाचताना!!

**-अशोक बागवे**

---

भगवान निळे यांची कविता ही जगण्या-वागण्याचा वेध घेताना व्यक्तिगत पातळीवरून समुहाची होत जाते. सरळ सोपी परंतु ठाशीव शब्दकळा अन् अंतर्मुख करणारी भगवानची कविता वैशिष्ट्यपूर्ण अशीच आहे.

**-डॉ. अस्मिता गुरव**

---

अन्याय, अत्याचार आपले खरे रूप बदलून नवनव्या पेहरावात येत असतात आणि आपले अन्यायी वर्चस्व गाजवीत असतात. हे बहुरुपीय अन्याय वेळीच ओळखणे कवी-कलावंतांचे प्रथम कर्तव्य असते. ते एखाद्याचं कवीला समर्थपणे जमते. हे महत्त्वपूर्ण कर्तव्य पार पाडण्याचे काम भगवान निळे यांची कविता करते. हृदय आणि मेंदूवर एकाच वेळी त्यांची कविता प्रहार करत असल्यामुळे ती नेहमीच ताजी वाटते.

**-लोकनाथ यशवंत**

---

ऐंशीच्या दशकात ज्या काही थोड्या मोजक्या लोकांनी गांभीर्याने कवितालेखन केले त्यातील महत्त्वाचे नाव म्हणून भगवान निळे यांच्याकडे पाहता येते. या दशकातील सर्वच कवींनी स्वत:च्या जगण्याचे उत्खनन आपल्या कवितेत केले. पण निळे यांची कविता स्वत:कडून समाजाकडे जाताना जात-धर्म, स्त्री-पुरुष यांच्यातील अंतर्विरोधाचा व्यापक पट उभा करते.

**-अजय कांडर**

---

कप्पेबंद संकल्पनांच्या पलीकडे जाऊन नवी जाणीव मांडण्याचे काम भगवान निळे यांची कविता करते. विद्रोह, वेदना, नकाराच्या पातळीवर व्यक्त होण्यापेक्षा तिच्यातील समजूतदारपणा हे निळे यांच्या कवितेचे बलस्थान आहे. पुरुषी आकलनाच्या कक्षेतील संवेदना मांडणारी ही कविता आहे.

**-डॉ. बाळासाहेब लबडे**

---

## सांगायलाच हवंय असं...

गेल्या शतकाच्या वीस-बावीस वर्षांपासून मी कविता लिहू लागलो. आपले किती संग्रह प्रकाशित झालेत हा प्रश्न मला नेहमीच विचारण्यात येतो. 'अद्याप एकही नाही...' असे सांगताच विचारणाऱ्याना खोटे तरी वाटते किंवा मी मस्करी करतो अशी त्यांची समजूत होते. साडेतीन तप काव्यलेखन केल्यानंतर हा माझा पहिलाच कवितासंग्रह.

एकही संग्रह नावावर नाही म्हणून एखादा कवी नवोदित असतो असे नाही. तसेच, तीन-चार संग्रह प्रकाशित आहेत म्हणून तो कवी नवोदित नसतोच असेही नाही. नावावर किती संग्रह आहेत यावर कवीचे आणि त्याच्या कवितेचे मोजमाप होत नसते.

एकही कवितासंग्रह नावावर नसतानाही माझे नाव बऱ्यापैकी साहित्यक्षेत्रात संबंधितांच्या परिचयाचे आहे, असे मी मानतो. चार-पाच पुस्तकांना मी प्रस्तावना लिहिल्या आहेत. मला परीक्षक म्हणून, पाहुणा म्हणून किंवा अध्यक्ष म्हणूनही साहित्यिक कार्यक्रमांना बोलावणे येते. समीक्षाग्रंथातही उल्लेख होतो. माझ्या कवितांवर 'पीएचडी'साठी प्रबंध लिहिण्यासाठीही विचारणा झाली आहे. आत्मस्तुतीचा धोका पत्करून मी हे दाखले दिले आहेत. कुणीही त्यात आत्मप्रौढी शोधू नये.

अनेक मित्रांनी आणि मान्यवरांनी माझा संग्रह यावा यासाठी प्रयत्न चालविले होते. त्यात विजय तेंडुलकर, विंदा करंदीकर, नामदेव ढसाळ यांचाही समावेश होता. 'गोलपिठा'नंतर

मी तुझ्याच संग्रहाला प्रस्तावना लिहिन असे तेंडुलकरांनी म्हटले होते. माझ्यासाठी ही खूप मोठी गोष्ट होती. 'ग्रंथाली'तर्फे तुझा आणि अशोक नायगावकरचा संग्रह काढायचा आहे असे सांगून अवधूत परळकर कित्येक महिने मागे लागला होता. आळशीपणामुळे ठराविक मुदतीत मी अवधूतला कविता एकत्रित करून देऊ शकलो नाही. ही खंत कधी कधी सलतेच... असो.

स्वत:चा संग्रह नसला तरी 'शब्द साहित्य, कला, सांस्कृतिक मंच' या माझ्या आणि प्रकाश ग. जाधव याच्या 'एकता' कला अकादमीतर्फे सहा काव्यसंग्रह, चार प्रातिनिधिक काव्यसंग्रह, एक आत्मकथन आणि एक नाटक अशी पुस्तके मी प्रकाशित केली आहेत.

मी ज्या काळात लिहू लागलो तो काळ कविता लिहिण्यास पोषक असाच होता. दलित साहित्याची चळवळ जोमात होती. पाठीशी 'लिटिल मॅगझीन' चळवळीचा वारसा होता. अस्वस्थ पिढी होती. देशभर असंतोषाचे वातावरण होते. कामगार, झोपडपट्टीवासीय, महिला, विद्यार्थी अशी कुठे ना कुठे आंदोलने चालू होती. आतासारख्या पुरोगामी चळवळी बोथट झालेल्या नव्हत्या. साहित्यिकांच्याही लेखणीसोबत मनगटात जोर होता. लोक स्वत:पुरता विचार न करता दुसऱ्यांसाठी रस्त्यावर उतरत होते. यांत्रिकीकरण आणि जागतिकीकरणाचे वारे घोंघावले नव्हते. मुख्य म्हणजे, फेसबूक आणि व्हॉट्स अपस् अस्तित्वात आले नव्हते. सगळ्यांकडे वेळ होता. गूगल नसल्यामुळे स्वत:च्या डोक्याचा वापर करणे भाग होते.

आता थोडे माझ्या व्यक्तिगत आयुष्याबाबत...

माझे बालपण अहमदनगर जिल्ह्याच्या संगमनेर तालुक्यातील धांदरफळ या खेड्यात गेले. प्रा. रावसाहेब कसबे, दया पवार, भाई संगारे आजूबाजूचेच. शहरात मुले बिघडतात असा माझ्या वडिलांचा समज. त्यामुळे मी सहावीपर्यंत गावी आजीकडे राहून शिकलो. समज येईपर्यंत आजीच माझी आई आणि वडील. सातवीला मात्र मला मुंबईत आणले गेले. आयुष्याची चांगली अठरा वर्षे मुंबईत, वरळीच्या मायानगर झोपडपट्टीत घालविली. याच झोपडपट्टीत मी खऱ्या अर्थाने माणसे पारखायला आणि वाचायला शिकलो. झोपडीच्या लाकडाच्या फटींमधून मला खरे जग दिसले... अनुभवायला मिळाले.

परळच्या महर्षी दयानंद महाविद्यालयात अकरावी, बारावीपर्यंत शिकलो. बाप गारेगार आईस्क्रिमची गाडी ढकलायचा आणि आई डोक्यावरील पाटीतून भाजी विकायची. मासिक पगार काय असतो हे मला मी नोकरीला लागेपर्यंत ठाऊक नव्हते. आर्थिक परिस्थिती हलाखीची

असल्याने एम.डी.मध्ये पहिले वर्ष मी चक्क पांढरा आणि एक चट्टेरीपट्टेरी लेंगा घालून काढले. वर्षाच्या शेवटी शिष्यवृत्ती मिळाल्यानंतर एक जीन्स विकत घेतली. माझ्या मामाने त्याच्या वापरलेल्या पण बऱ्यापैकी चांगल्या असलेल्या दोन विजारी दिल्या होत्या. त्या मापाच्या करून वापरल्या. अर्थशास्त्र शिकविणाऱ्या शिवरामन या मॅडमने स्वत:च्या घरी नेऊन तिच्या नवऱ्याची एक पँट मला दिली होती. लेंगा घातल्याची लाज वाटत नव्हती आणि जीन्स घातल्याने हिरो झाल्याची समजूतही नव्हती.

एमडी कॉलेजमध्ये केशव मेश्राम, शांता शेळके आणि मोहिनी वर्दे शिकवायला होते. वाचनाची पहिल्यापासून गोडी असल्याने मिळेल ते वाचत होतो. कविताही बऱ्यापैकी वाचल्या होत्या. कवितेची विशेष गोडी होती. मात्र त्या काळातही चंद्र, तारे, फुलांच्या कविता भिडत नव्हत्या. आपल्या वाटत नव्हत्या. त्या कवितांमध्ये मला मी दिसत नव्हतो. माझी आजूबाजूची माणसे दिसत नव्हती. पुरोगामी आणि सामाजिक, वास्तववादी कविता जवळच्या वाटायच्या. अस्वस्थ माणसाला अस्वस्थ करून सोडणाऱ्या कविताच भिडत असाव्यात.

आयुष्यात पहिली कविता 'दलित ब्राह्मण' नावाची लिहिली. मेश्राम सरांनी ती कॉलेजच्या विशेषांकात छापली. त्या कवितेवर मुंबई सकाळ, लोकसत्ता आणि नवाकाळ या दैनिकात चार शब्द स्तुतीपर लिहून आले. आपण लिहिलेले लोकांना आवडते हे कळल्याने विश्वास वाढला आणि मी आणखी कविता लिहू लागलो, वाचू लागलो, जगू लागलो.

माझ्या कविता साधना, दीपावली, अस्मितादर्श, अधिष्ठान, युगवाणी, तात्पर्य, लोकवाङ्मय, पूर्वा, कविताश्री, अभिरुचि, सावाना, अक्षर वैदर्भी, आकंठ, मराठवाडा, विशाखा, शब्दांगण, आयुध, पुष्कळा, किशोर, शब्दालय, खेळ, रूची, अक्षर, झपूर्झा आदी नियतकालिके, मासिके आणि दिवाळी अंकातून प्रसिद्ध होऊ लागल्या. यातील बहुतांश नियतकालिके चळवळ संपल्याने बंद पडली. एका रात्रीत स्टार होण्याचे ते दिवस नव्हते, खूप घासावी लागली.

कवी म्हणून ओळख होताच मी 'शब्द साहित्य, कला, सांस्कृतिक, मंच' या संस्थेची स्थापना केली. मंगेश विश्वासराव, बबन लोंढे, विजय साखळकर, स्वप्ना चिटणीस, बाळ कांदळकर, गोविन्द गायकवाड, राजन गोंदकर, प्रकाश ग. जाधव, आशिक शेख, आबासाहेब चासकर, अवि दाभाडे, बी. गीतांजली असे बरेच कवी त्यात होते. नारायण सुर्वे आणि

प्र.श्री.नेरुरकर आमचे मार्गदर्शक, आश्रयदाते. ‘शब्द’च्या बैठका दादर येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या ‘पायरी’वर होत असत.

‘मुंबई मराठी’ आमचा अड्डाच बनला होता. येथेच गुरुनाथ धुरी आणि मनोहर ओक या अवलिया आणि कलंदर कवींना जवळून पाहून आणि अनुभवून कवितेबद्दलची आस्था वाढत गेली.

‘शब्द’ संस्थेतर्फे कविसंमेलन, पुस्तक प्रकाशन, पोस्टर पोएट्री, कवी आपल्या भेटीला, काव्यस्पर्धा अशा अनेक उचापती केल्या. मंगेशच्या पहिल्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन केले ते वसंत बापट यांच्या हस्ते. तर प्रकाशच्या संग्रहासाठी विजय तेंडुलकर, नारायण सुर्वे, रमेश देव, नामदेव ढसाळ, प्र.श्री. नेरूरकर, अरुण साधू, ह.मो.मराठे, अशोक बागवे हे सर्व मान्यवर एकाच व्यासपीठावर कोणत्याही मानधनाशिवाय आले होते. आम्ही मुले पैसे गोळा करून कार्यक्रम करायचो तर मानधन कुठून देणार?

कविता लिहीत असतानाच मी ‘एमडी’मधून चर्चगेटच्या ‘के.सी.’ कॉलेजला गेलो. येथे मी ‘विद्यार्थी प्रगती संघ’ या संघटनेत सक्रिय झालो. या संघटनेतर्फे आम्ही ‘कलम’ नावचे मासिक चालवायचो. मी संपादक मंडळात होतो. ‘कलम’मध्ये भुजंग मेश्राम, ‘दस्तखत’कार प्रकाश जाधव, तुलसी परब, मनोहर वाकोडे आदी अनेक पुरोगामी कवींच्या कविता छापल्या. या संघटनेतच माझी मार्क्सवादाशी तोंडओळख झाली. जगण्याकडे पाहण्याचा शास्त्रीय दृष्टिकोन लाभला.

काही काळ ‘नौजवान भारत सभा’ या संघटनेत काम केले. संघटनेच्या ‘ठिणगी’ नावाच्या मासिकाच्या संपादक मंडळात काम केले. तसेच संघटनेच्या ‘आव्हान नाट्य मंच’मधून संभाजी भगत, शाहीर विलास घोगरे, अश्विन तांबट, सानोबर यांच्यासह पथनाट्ये केली. काही वर्षांनंतर वैचारिक मतभेद झाल्याने माझ्यासह एक गट संघटनेतून बाहेर पडला. आणखी काही वर्षांनंतर संभाजीही त्याच प्रश्नावर बाहेर पडला आणि संघटनेला कायमचे टाळे लागले.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच ‘व्हीपीएस’मधील धनंजय कर्णिकमुळे दैनिक ‘नवशक्ति’त उपसंपादक म्हणून चिकटलो. त्या आधी पु.रा.बेहेरे संपादित ‘राजधानी’ या साप्ताहिकात ‘कॉलेज विश्व’ नावाचे सदर चालवित होतो. येथेच परेन शिवराम जांभळे आणि नरेंद्र बोडके भेटले. या दोन कविमित्रांशी दोस्ती मरेपर्यंत टिकली.

'नवशक्ति'त पु.रा.बेहेरे, भाऊ जोशी, अशोक पडबिद्री, तुकाराम कोकजे, आत्माराम सावंत, वसुंधरा पेंडसे-नाईक, ह.मो.मराठे, मिलिंद गाडगीळ, विनायक पात्रुडकर, सचिन परब, प्रकाश कुलकर्णी आदी संपादकांसोबत आणि भाऊ फाटक, हिं. गो. बनसोडे, सुभाष समेळ, मीना कर्णिक, सुभाष देशपांडे, प्रताप आसबे, कपिल पाटील, बोडके, जांभळे, सोमनाथ पाटील, सतीश खांबेटे, तुषार नानल, दीपक परब, अशा अनेक सहकाऱ्यांसोबत काम करायला आणि शिकायला खूप मिळाले.

कवी, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ता अशा तीन अंगाने माझी जडणघडण होत गेली.

पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ता असल्याने कवितेला सामाजिक भान येत गेले. मायानगर झोपडपट्टीचे मोठे योगदान माझ्या कवितेला आहे. पत्रकार असल्याने वेगवेगळ्या जातिसमुहांशी, वर्गाशी माझा जवळचा संबंध आला. राजकीय नेते, मंत्री यांच्यात उठबस करतानाच मायानगरमधील गौत्या, हनम्या, सुभाष हे गर्दुलेही माझे मित्र होते. प्रेस कॉन्फरन्सच्या निमित्ताने ताज, ओबेरॉय, सी रॉक अशा पंचतारांकित हॉटेलमध्ये जेवलो तसाच वडाळा स्टेशनजवळील मणीच्या गाडीवर फुटपाथवर बसून भुर्जीपाव खाल्ला. विमानात फिरलो आणि पैसे नसल्याने घरापर्यंत 'वन टू' करीत चालतही आलो. एकाचवेळी अनेक आयुष्य जगलो. माझी कविता त्याच अंगाने वाढत गेली. कोणत्याही कळपात स्वत:ला अडकवून न घेतल्याने मला आंबेडकरी साहित्यिक 'दलित कवी' मानत नाहीत. मार्क्सवादी लेखक-कवी मला 'डावा' समजत नाहीत. कलावादी साहित्यिक मला त्यांच्यात मोजत नाहीत. एक मात्र खरे की या तीनही गटातील लोक मला 'कवी' समजतात... हीच गोष्ट माझ्यासाठी मोठी आहे. मानवी वेदनेला जातकुळी नसते हेच खरे.

विशिष्ट काळात आणि विशिष्ठ परिस्थितीत जन्माला आल्यामुळे माझी जी काही कविता आहे ती अशी आहे. जगणं आणि लिहिणं यात फार काही अंतर मी ठेवले नाही. छंद म्हणून कविता लिहाव्याशा वाटल्या नाहीत; काव्यप्रतिभा ही दैवी देणगी आहे असे मी मानत नाही. क्रांती घडवून आणण्यासाठी विशिष्ठ पोझ घेऊन मी कविता पाडल्या नाहीत. स्वांतसुखासाठी मी कवितेच्या नादाला लागलो नाही. दु:खाचे भांडवल करून उदात्तीकरणही करायचे नव्हते. कवी म्हणून मिरवायचे नव्हते. तसे असते तर आतापर्यंत माझे किमान तीन-चार संग्रह तरी नक्कीच प्रसिद्ध झाले असते.

मला वाटते, स्वत:ला शोधून काढण्यासाठी मी कविता लिहिल्या असाव्यात. माझ्या कविता माझी आत्मकथाच आहे. माझे आत्मचरित्र माझ्या बायोडाटापेक्षा मोठे नाहीच. हा संग्रह माझा ‘बायोडाटा’ आहे. कवितेतून मी मोकळा होतो. कवितेतून मी स्वत:शी बोलत असतो. मात्र कविता माझा श्वास आहे असे म्हणण्याइतपत भाबडा मी नक्कीच नाही.

कवितेव्यतिरिक्त अनेक गोष्टी करण्यासारख्या आहेत त्या मी करतोच. पण कवितेतून मला स्वत:ला पाहता येते, स्वत:शी भांडता येते, स्वत:ची समजूत काढता येते, स्वत:वर प्रेम करायला मला कवितेने शिकवले. कवितेने मला माणसे जोडून दिली, माणूसलोभी असल्याने माणसे गोळा करून दिली. मला अजूनही माणसे जोडायची आहेत. लोकसंग्रह वाढवायचा आहे. आणखी लिहायच्या आहेत कविता. अप्रतिम कवितेच्या मी शोधात आहे. मरणापूर्वी अशी एखादी कविता लिहायची आहे जी कित्येक वर्षं माझ्यानंतरही जिवंत असेल. पुन्हा एकदा असो.

माझा काव्यसंग्रह प्रसिद्ध व्हावा अशी गळ लोकनाथ यशवंत, संभाजी भगत, अशोक बागवे, आनंद विंगकर, सुभाष थोरात, योगिनी राऊळ, गीतेश शिंदे, सुखदा कोरडे, प्रेरणा भराडे या मित्र-मैत्रिणींना घालून त्यासाठी आपापल्या परीने प्रयत्न चालविले होते. परन्तु त्यांच्या प्रयत्नांना मी धजत नव्हतो. अनेकांनी हात टेकले होते. सरिता, माझी बायको, तर मला सांगून सांगून कंटाळली होती. शेवटी चळवळीतला माझा जुना सहकारी आणि ‘सृजन’चा प्रकाशक विजय जाधवने कविता एकत्र करून माझ्या शब्दांना प्रकाशाचे दार दाखविले. सतीश भावसार माझा ‘नवशक्ति’तला सहकारी असल्याने अप्रतिम मुखपृष्ठासाठी त्याचे आभार मानलेले त्याला आवडणार नाही. आवडले तरी मी मानणार नाही. मित्रांचे ऋण मानायचे असते का? थांबतो.

तुम्ही मात्र संग्रह वाचल्यानंतर कविता आवडल्या तरच इतरांना सांगा. नाही आवडल्या तर मला नक्की सांगा.



भ्रमणध्वनी : ९७०२१४६८८०
bhagwannilejii@gmail.com

## गणगोत

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले । मधु मंगेश कर्णिक । सतीश काळसेकर । मलिका अमर शेख । उत्तम कोळगावकर । भारत पाटणकर । रामदास आठवले । मनोज संसारे । सुनील खोबरागडे । अविनाश महातेकर । प्रकाश कुलकर्णी । देवदास मटाले । निखिल वागळे । प्रज्ञा दया पवार । मंगेश नारायण काळे । सचिन परब । राजू नायक । विष्णू सूर्या वाघ । संदेश प्रभुदेसाई । यशवंत कुडतकर । लोकनाथ यशवंत । संभाजी भगत । अशोक बागवे । अरुण म्हात्रे । महेश केळुसकर । अर्जुन डांगळे । जयंत पवार । अजय कांडर । कैलास म्हापदी । अशोक नायगावकर । नीळकंठ कदम । सुधाकर गायकवाड । हेमंत दिवटे । डॉ. अस्मिता गुरव । डॉ. श्रीधर पवार । डॉ. मंगेश बनसोड । साहेबराव ठाणगे । नारायण लाळे । महेश म्हात्रे । प्रदीप म्हापसेकर । प्रा. दामोदर मोरे । भीमसेन राठोड । छाया कोरगावकर । डॉ. श्यामल गरुड । मोतीराम कटारे । डॉ. शशिकांत लोखंडे । सायमन मार्टिन । अशोक बेंडखळे । सुदाम राठोड । किशोर पाठक । नितीन हिरवे । बाळासाहेब धोंगडे । किरण येले । भालचंद्र कुबल । बाळासाहेब लबडे । भाऊ विशे । अविनाश गायकवाड । दुर्गेश सोनार । दासू भगत । विजय ना. जाधव । सतीश भावसार आणि तुम्ही...

**तेरा**

## इथपासून... तिथपर्यंत !


१. मी म्हणजे, तुम्हीही! । १७

२. तेव्हाही आजच्यासारखेच । १९

३. अशी कित्येक वर्षे लोटलीत । २२

४. हेही दिवस जातील, नाही असे नाही । २४

५. अजूनही वेळ गेलेली नाही... । २६

६. वांझोटी रात्र । २८

७. सर्पमिठी । ३१

८. ६३ ऐवजी ३६ । ३२

९. नुसत्या एका आठवणीने । ३४

१०. आरस्पानी बाई । ३६

११. मान्यच करायला हवे की । ३८

१२. उजेडाचा रंग । ४०

१३. कोण हा पुरुष? । ४२

१४. पहिली भेट । ४४

१५. दु:खायण । ४६

१६. उदास रात्री काळाच्या प्रवाहातील गाणे । ४७

१७. कधी जमणारच नाही का? । ४९

१८. लोढणे । ५०

१९. पुरुषघाणी । ५२

२०. पेटलेल्या माणसांच्या कोलाहालात । ५४

२१. सत्यामागे दडलेले सत्य । ५५
२२. बायकांना... । ५७
२३. या बायका । ५८
२४. इतक्या वर्षानंतरही । ६०
२५. मासे साफ करताना... । ६१
२६. पुरुषांच्या सावलीमागे लपलेल्या बायका । ६३
२७. पहाट होण्याआधी । ६४
२८. व्हर्जिन बेट । ६५
२९ सहज । ६७
३०. आंघोळ न केलेला पाऊस... । ६९
३१. जंगलात लढणारे । ७१
३२. आठवण । ७३
३३. डाव्या बोटावरील दुर्भाग्याचा खिळा... । ७४
३४. भुकेची भाषा । ७६
३५. पाखरं । ७७
३६. त्यावेळी नक्कीच असं नसेल । ७९
३७. एका क्षणात । ८०
३८. एका संध्याकाळी । ८२
३९. नुसतंच भरून येतं । ८४
४०. का? किती? कशासाठी? कुणासाठी? । ८५
४१. दोन चेहेरे मुंबईनगरीचे । ८६
४२. श्याना कौवा... । ८९

४३. तुझा पूर्णाकृती पुतळा । ९२
४४. मी इतिहासाशी बोलत असतो । ९६
४५. मनाचा कोंडवाडा । ९७
४६. ओसाड गावचा अनभिज्ञ सम्राट । ९९
४७. असं का होतं? । १०१
४८. माणसं वागू लागतील पशुसारखी । १०२
४९. मी नाही कुरुप । १०४
५०. सौंदर्य । १०५
५१. लखलाभ । १०७
५२. शहाणपण । १०८
५३. सगळ्यांनाच होतो विटाळ । ११०
५४. सुखकर्ता! दुखहर्ता! । १११
५५. पाच तुकडे : प्रार्थनेचे । ११३
५६. न सुटलेल्या प्रश्नांचे लटांबर । ११५
५७. माझाही बाप । ११७
५८. आई गेल्यानंतर । ११९
५९. माझ्या छबुकल्या डड्डा... । १२१
६०. आणि डड्डा । १२४
६१. माझ्या मुलीच्या समजुतीखातर... । १२७
६२. मुलगी मोठी होते तेव्हा... । १२९
६३. मी मी झालो । १३१
६४. मरणाआधीची प्रेतयात्रा । १३३
६५. मरणाचा शेवट । १३४
६६. मी मरेन तेव्हा... । १३५

## मी म्हणजे, तुम्हीही!

मी एकटा असलो तरीही
गर्दी असते आजूबाजूला.
गर्दीचा विचार करता करता
होऊन गेलेलो असतो गर्दीचाच चेहेरा.
मी आहे दरवाजा आपल्या देशाला जाणून घेण्याचा
माझीच सावली पडली आहे देशावर सर्वदूर.

माझ्या सुखाच्या वाटेत उभी केली आहे भिंत.
मी साधे पाहूही शकत नाही
खिडकी किलकिली करून माझेच आभाळ.
माझ्या आयुष्याच्या कॅलेन्डरवर
चिकटविला गेला 'नापास' असल्याचा फोटो.
काखा वर करून निघून जातो माझा हरेक दिवस
उडाणटप्पू पोरासारखा.
दु:खावर हक्क सांगण्याचाही नाही ठेवला अधिकार माझ्याकडे
त्याचेही भांडवल करून केला गेलाय कॉपीराईट.
पालखीचे भोई बनवून मला केले गुलामकरी
माझ्याभोवती रूढीचे 'रिंगण' आखून.
सर्वांगावर फासलाय संस्कृतीचा आबीर गुलाल,
माथ्यावर मळवट जन्मजात दारिद्र्याचा.

जरी निघाले असले माझे आयुष्य
तरी निघाले नाही अजून दिवाळखोरीत
काळजाच्या आत जपलेले शब्दभांडार कवितेचे.

माझा शब्द आरस्पानी
नाही निघत त्यातून वेगवेगळे अर्थ.
संदर्भासहीत स्पष्टीकरण द्यायला वेळ आहे कुणाकडं?
माझ्या गप्प बसण्याचाही होतो आवाज
कुणाचीही झोप उडविण्यापुरता.
मग सांगा-
आपल्यासाठी आपण गर्दीच्या तोंडाने बोललो तर?
खरे तर;
मी म्हणजे, तुम्हीही!

▲

## तेव्हाही आजच्यासारखेच...

पूर्वीपेक्षा खूप वाईट दिवस आलेत
अन् येणारा उद्या आजहून बिकटच असेल
असेही नाही.
प्रत्येक पिढीचा वर्तमान
कधीच सुखावह नसतो
आपण मात्र
भूतकाळ चांगला होता अशी समजूत करून
सदैव कुंठीत अवस्थेत मात्र कुंथत असतो.

दु:खाचे व्याकूळ गाणे पाठ सोडत नाही
कोणत्याच हंगामात
काळजाचा कान बनून ते ऐकू येतेच
नेहमीच चिघळतात हळदुल्या जखमा
तिरस्काराची बिरूदे नको असताना
मिरवावी लागते पदोपदी
संवेदना मरून पडलेला चिखल तुडवीत
बरबटलेल्या पावलांनी आपण
शतके ओलांडत चालत असतो
ताटकळत उभे असलेले मनाचे झाड
हलत नाही, फुलत नाही, फळत नाही
हरेक मोसमात.
राक्षसाचे कपडे घालून व्यवस्था उठते जीवावर
सत्त्येचे भुकात्मे हिंडतच असतात दिवसाढवळ्या
ते किचकट करून टाकतात

जगण्याचे सोपे सुटसुटीत गणित
अवघड प्रश्नांवर देतात
नेहमीच्या अनाकलनीय उत्तरांचा उतारा
विटाळ झालेली नजर
पाहते त्यांना दाखवयाचे आहे तेच
हलवून हलवून लुळी पडलेली नंदीबैलाची मान
अन् आपल्या मोडलेल्या कण्याला
त्यांनी दिलेला धर्म-संस्कृतीचा टेकू
शाबूत ठेवण्यात ते असतात चलाख
मिशीत आलेली पोरं खेळतात शिमगा
देव, धर्म अन् बेकारीच्या नावाखाली
यांच्या काचेच्या डोळ्यांना दिसतो
फक्त पणतीच्या बुडाखालचा अंधार.

भाकरीभोवती फिरतेय भूक पृथ्वी होऊन
नि माणूस धावतोय त्याच्याभोवती आखलेल्या परिघात

पुन्हा पुन्हा हलवून घट्ट करतोय
जगण्याच्या लालसेचा खुंटा

अंगाला अंग घासल्याचा आवाज आला की
तेव्हाही मोठे व्हायचे संस्कृतीचे डोळे
तेव्हाही होत्या सावल्या अस्पृश्य
तेव्हाही फिटायच्या बायकांच्या निऱ्या
हाताला काम अन् पोटाला भाकर
यासाठी तेव्हाही यावे लागायचे रस्त्यावर

तेव्हाही मिळायचे दंडुके आणि बंदुकीच्या गोळ्या
तुम्ही काय खायचे? काय पहायचे?
काय घालायचे? काय लिहायचे?
काय बोलायचे?
यावर तेव्हाही होती त्यांची हुकूमत
तेव्हाही नकार देत लोक निघायचे घराबाहेर
शोषणाचे असंख्य दरवाजे असतात
अन् अन्यायाच्या विरोधात लोक
पूर्वापार नकार देत
उभे ठाकतातच पूर्वीसारखे...

▲

# अशी कित्येक वर्षे लोटलीत

अशी कित्येक वर्षे लोटलीत
शहरावर संध्याकाळ उतरू लागली म्हणजे
न चुकता खिडकीत येऊन ती
खिडकीची चौकट होते.
माझी पाऊलवाट तिच्या डोळ्यात घुटमळत असते.

या शहरात दबा धरून बसलेल्या
सुप्त मरणांना हुलकावण्या देत
मी मोहल्ल्यात परततो तेव्हा
ती खिडकीतच विरघळून गेलेली असते.

दिवसभराचा वैताग उंबरठ्याबाहेर ठेवून
मी ओठांत हसतो
ती क्षणभर फुलते.
मग आमच्यात कितीतरी वेळ मूकपणा.
रस्त्यात अनाहुतपणे कालांतराने
एखादी शाळकरी मैत्रीण भेटावी आपल्या नवऱ्यासोबत
नि, आपण काहीच न बोलता
बरंच काही बोलून जावं तसा.

मी उद्याच्या विवंचनेत पडल्यावर
बिछान्यावर अंग टाकून सिगारेट शिलगावतो.
सिगारेट न ओढण्याबद्दल तिने
बऱ्याचदा बजावलेले असूनसुद्धा

तीच ॲश ट्रे आणून ठेवते न सांगता
अशावेळी माझं अस्तित्व
सिगारेटच्या राखेहूनही ठिसूळ झालेलं असतं.

दिवा मालवून ती
माझ्या घुसमटलेल्या छातीवर
केस मोकळे सोडून डोकं टेकवते हळुवार
माझी जगण्यातली उमेद पल्लवीत होते.
मग मी अलगद तिला माझ्या बाहूत घेतो
किती तरी वेळ ती निपचित पडून राहते
अन् नकळत माझ्या छातीवर अश्रूंनी चंद्र कोरते.
तेव्हा तिची अबोल वेदना
माझे आकाश विस्तारीत जाते.

अशी कित्येक वर्षे लोटलीत
कूस बदलताना आपलं कुंकू पुसणार नाही
याची ती काळजी घेत असते
नि, मी,
शहरात दबा धरून बसलेल्या सुप्त मरणांना
हुलकावण्या देत असतो.

▲

## हेही दिवस जातील, नाही असे नाही

हेही दिवस जातील नाही असे नाही
तू मात्र धीर सोडू नकोस
माझ्यातली धमक लटपटू लागते.

वेगवेगळ्या रंगाचे फटकारे मारलेलं आभाळ
मुठीत दडवून
तू जगत आली आहेस
पारा उडालेला आरसा हृदयाला कवटाळत
माझा परिस्थितीने गांजलेला ओबडधोबड चेहरा
माझा एकट्याचा नाही
हे जाणवताच तुझ्या स्वप्नांचा रंग उडू लागतो
आणि तू आणखीनच दुर्बोध होत जातेस.
कबूल की, गळाभर गाळात अडकलेलं मी चाक
व्यवहारशून्य
रणांगणातला जखमी घोडा
दुनियेच्या अन् तुझ्या लेखी कामातून गेलेली केस
कारण,
प्रारब्धावर हवाला ठेवून
मी रचित नाही मनसुबे गुलाबी स्वप्नांचे
म्हणूनच स्वत:वर जुलूम करण्याची पाळी माझ्यावर येत नाही.

माझी ओढाताण, अन्
माझं मलाच समजावणं तुला समजल्यानंतर
तू कैकदा पाहिलं आहेस असहाय्यपणे

मात्र,
प्रत्येक रात्री स्वत:ला चाचपत
तू छताकडे एकटक पाहत राहतेस
तेव्हा माझ्या उमेदीचे दोरही सैल होत जातात.

आता
तू हे वातीसारखं थरथरणं सोडून दे
भडका उडेलही... नाही असे नाही
पण स्वच्छ रात्रही विझून जाईल.
माझा माझ्याप्रमाणेच तुझ्यावरही विश्वास आहे
तू मात्र खचू नकोस!

हेही दिवस जातील नाही असे नाही ...

▲

## अजूनही वेळ गेलेली नाही...

कागदाच्या एका चिटोऱ्यासरशी
आपण होणार आहोत एकमेकांना अनोळखी.

स्वतःच काढलेल्या गोजिरवाण्या चित्रावर
सपासप ओरखडे ओढायची तुझी सवय
अन्
माझ्या निर्मळ एकांतात फुगड्या घालून
नात्यांना अपवित्र करण्याची तुझी खोड
आपल्याला घेऊन आली आहे
विध्वंसाच्या दारावर.

माझ्या पुरुषार्थाला
घट्ट, घट्ट गाठी मारून
तू आपल्यातील विश्वासाचे दोर
अधिकाधिक सैल करीत गेलीस
नि,
माझ्या मनातून थेंब थेंब आटत राहिलीस.
माझ्या ओबडधोबड आत्मचरित्राला
कलंकित करून तू मिळवू शकत नाहीस
गावभर धिंडोरा पिटवून अश्रूंच्या जोरावर असहाय्य सत्तेची पावती.
कारण,
मी कधीच जगलो नाही
तत्त्वांना मुरड घालून डिक्टेट केलेले आयुष्य.
हे मला ओळखणारे ओळखून आहेत.

पूर्वी हत्तीवरून साखर वाटली जायची
ते ऐश्वर्याचे लक्षण मानले जाई
आता हत्तीवरून भीक मागितली जाते
हे वास्तव तुला कधी उमगलेच नाही.
तू फक्त अंबारीच पाहत राहिलीस.
म्हणून तर,
तुझ्या वांझ दु:खाची शेपूट तुटलेली पाल
माझ्या मनात अजूनही खोलवर वळवळतेय

मी तीस वर्षे उशिरा जन्म घेतला असता तर
तू मला पंखाखाली घेऊन
माझ्या जावळावरून मऊशार हात फिरवला असतास
अन् मला
सुखाची नेमकी गोडी चाखता आली असती.

अजूनही वेळ गेलेली नाही
तुला अजूनही माझी आई होता येईल
अन् मला तुझं बाळ...

▲

## वांझोटी रात्र

रात्र सवत बनून झोपली आहे उशाला
अन्
माझ्या टिकलीचा कायदेशीर धनी
माझ्यावर नुकतीच हुकूमत गाजवून
निवांत झोपी गेला आहे पाठमोरा.

खरे तर
नवरा शेजारी झोपलेला असताना
अशी विचित्र स्वप्न पडणे संस्कृतीत बसत नाही.
मी पुन्हा पुन्हा हुसकावून लावते त्यांना
तर बिनचेहेऱ्यांची ही खट्याळ स्वप्ने
माझ्याशी लगट करून विस्कटून टाकतात
माझं शांत नितळ चाकोरीबद्ध तळे.
हे तरंग थोपता थोपविता येत नाहीत.
मी अपराधी नजरेने पाहते नवऱ्याकडे
तर त्याच्या तृप्त देहावर पसरलेली असते बेफिकीर शांतता.
मैदान मारून नेल्याचे त्याचे भाव
मला पराभूत केल्याची जाणीव करून देतात.

प्रत्येकवेळी शरीरांच्या जोडाक्षरातून
चांदणं फुटतंच अस नाही.

अनेक रात्री मी छताकडे पाहत निर्विकार
निपचित पडून असते स्तब्ध

आरूढ झालेल्या नवऱ्याचा अश्वमेध
उधळला असला बेफाम तरी
मैदानात मी कुठेच नसते आजूबाजूला.
नेमके त्याचवेळी
मला आठवते गल्लीच्या सुनसान बोळात
संधी साधून प्रियकराने धुसमुसळेपणाने घेतलेले पहिले चुंबन
माझ्या शुष्क ओठांवरील त्याच्या ओठांचे मधाळ ठसे आजही ठळक आहेत.

प्रत्येक रात्री यंत्रवत नवरा एकटाच
खेळत बसतो प्रतिस्पर्धी नसलेला खेळ.
तो कितीही झाला आक्रमक
त्याने कितीही कुस्करले मला
तरीही त्याला पोहचताच येत नाही
माझ्या शरीराच्या पल्याड.
तो एकटाच खेळत बसतो कुस्ती. अन्
विजयी झाल्याच्या अविर्भावात झोपी जातो.
त्याने कधी जाणलेच नाही
हाडमांसाच्या लिबलिबीत रक्ताळ देहापल्याड
उभी आहे एक नाजूक हळवी दुनिया.
नुसत्या स्पर्शाने शहारते रान, थरारतो चन्द्र,
कूस बदलतो समुद्र
नि, क्षितिज विसावते मान धरतीच्या खांद्यावर.
माझ्या स्पर्शातून त्याने कधी अनुभवलेच नाही मनाचे नितळ जांभळे आभाळ.
मग;
बिनचेहऱ्याच्या अस्पष्ट आकृत्या
माझ्या मनात झिम्मा खेळू लागल्या तर

मी का बंद करून घेऊ मनाचे कवाड?

नवरा अजूनही पाठमोरा झोपला आहे विजयी मुद्रेने
अन्
या आकृत्या मला बोलावताहेत सांकेतिक भाषेत.
अनेक वर्षांची ही घालमेल, अन्
कधीही न संपणारा नपुंसक खेळ सुरूच आहे.

▲

## सर्पमिठी

बायको झालीस म्हणून
मी कसाही खेळू शकतो तुझ्या शरीराशी
उभा-आडवा
असे समजू नकोस
लग्न म्हणजे,
समाजानं संभोगाला दिलेली कायदेशीर मान्यता
असं गृहीत धरून अंथरू नकोस स्वत:ला
मला हवे तेव्हा
प्रत्येक पुरुषाच्या धमन्यातून सळसळत नाही वीर्य
मादी पाहिल्यानंतर
अश्रुंचं मूल्य कधीही रक्ताहून अधिकच असतं.

लख्ख ऊन पडलं आहे
तुझ्या डोळ्यातले काजवे चमकू लागले आहेत.
माझ्याही शरीरात वाजताहेत संबळ.
आपल्या बेडरुमला फुटली आहे टवटवीत पालवी.
दोन शरीरांच्या सर्पमिठीसाठी रात्रच हवी असं नाही
देहासोबत मने जुळली की
अंधाराचं काजळही लकाकतं.
ये -

: फ्लॅटचे हप्ते कसे फेडायचे त्याचा विचार नंतर करू ...

▲

## ६३ ऐवजी ३६

वीस वर्षाच्या संसारानंतरही ती
नवऱ्याकडे पुरुष म्हणूनच पाहते
नि
नवरा तिच्याकडे बाई म्हणून.
आधी तिचा नवरा छातीवरून हात फिरविण्यापूर्वी
केसातून बोटे फिरवायचा
त्याच्या डोळ्यात दिसायची नाही तिला
पुरुषपणाची आशाळभूत चमक
तो जवळ आला तरी हृदयात फडफडायचे कबूतर
पोटात उगाचच डुचमळायचे
त्याच्यासाठी मध्यरात्री चांदणी व्हायची ती
त्याच्या कुशीत डोके घुसळले की
खूप हलका वाटायचा तिला दिवसभराचा शीण
तिला वाटायचे त्याच्याकडे असावी काळजाला हात घालणारी किल्ली
वाटायचे त्याने छत दाखविण्यापूर्वी
करावेत लाड लहान मुलासारखे
पुरवावेत सहजशक्य असलेले हट्ट
निरूपद्रवी नखरे करावेत सहन
खेळवावे, लोळवावे,
चढावे अन् चढवून घ्यावे
अन्
मिठीत घेऊन पहाट फुटेपर्यंत
नुसते गुलुगुलू बोलत रहावे डोळ्यात पाहत.

आता तीही
त्याला घेत नाही पंखाखाली
त्याच्यासाठी उघडत नाही दार
चहा देत नाही मागितल्याखेरीज
सजवत नाही शेज
बिछान्यात त्याच्या असल्याचे प्रयोजन नसते तिच्या लेखी
उरकून झाल्यावर सुटी होते त्याच्यापासून.
दोघेही झाले आहेत आता एकमेकांना पारखे
शिणले आहेत सहवासात
सरळपणाच्या मार्गावर चालताना
करतात वाटा वाकड्या
विसंबून राहतात स्वत:वरच
अखंड वैताग असतो दोघांच्याही आजूबाजूला
दोघे सतत शोधत असतात
एकांतासाठी कोपरा
संसार वाटू लागलाय त्यांना बेभरवशाचे सुख.
जमिनीत तोंड खुपसून ते
जपू पाहतात शहामृगी नाते
डाव्या हातात ताणलेले संबंध
अन्
उजव्या हातात मुलांच्या भवितव्याची चिंता घेऊन
ते अजूनही एकाच आभाळाखाली झोपतात
६३ ऐवजी ३६ चा आकडा बनून...

▲

# नुसत्या एका आठवणीने

तिची अवचित आठवण येताच
गाभुळते आभाळ, डुचमळतो समुद्रतळ
माझ्यातल्या सर्व खिडक्या बंद करून टाकल्या तरीही
पावले उमटतातच उंबरठ्यात
अचानक होते चिमण्यांची कलकल
दिसू लागते डोळ्यात पानांची सळसळ
अशावेळी दुःख साजरे करायलाही
मिळत नाही उसंत
सुरू होतो जगण्याचा सोहळा
कुलीन पताका फडकतात आभाळावर
कलंडते पोकळ शब्दांची कलात्मक उतरंड
एकटेपणाचा अनुवाद होतो जत्रेत
सुखाची उसनवारी होते कुठून तरी
प्रतिभेला फुटतात डोळे
तिला पुन्हा पुन्हा पाहण्याचे लागतात डोहाळे
मग मीच माझ्याकडे पाहतो साशंक नजरेने
वाढत्या वयाला थोपविण्याचा करतो प्रयत्न निष्फळ
काळाला बुचकळ्यात टाकण्याचा माझा अट्टहास
पडतो फिक्कट तिच्या जीवघेण्या हास्याने
मी घासून पुसून स्वच्छ करतो सर्व शब्द तिच्यासाठी
तिच्या आठवणींच्या निळ्या जांभळ्या उजेडात
मनसोक्त आंघोळ करून मी
अधिकाधिक होतो ताजातवाना
घरातल्या घरात अस्वस्थ येरझारा मारताना

मांडामांड करतो खट्याळ स्वप्नांची
माझ्या घराचा उंबरठा ओलांडताना ती
नितळ मनाने लवंडेल विश्वासाचे माप
समुद्र खवळेल
जमीन तळमळेल
आभाळ विस्तारेल आपले हात
क्षितिजावर खेळली जाईल रंगपंचमी
नद्या मुरडत मुरडत जातील समुद्रापर्यंत
ओबडधोबड डोंगरांना येतील गोजिरे आकार
झाडेच गाऊ लागतील पाखरांची गाणी.
नुसत्या एका आठवणीने
माझे सदोष जग नव्याने जन्माला येईल...

▲

## आरस्पानी बाई

बाईला पुरुषाने मिठीत घेतले की
तिचे कपाळ आणखी नितळ का होते कळत नाही
मग मांडीत साप वळवळताच
बायका प्रेमाच्या बाजूने वाहत जाऊ लागतात.

नवऱ्याच्या चांगुलपणातून जे काही मिळते
त्यावर आयुष्य रेटतात बायका
त्यांच्यातील माणूसपण काढून
ओळख हिरावून घेतल्याचे त्यांच्या लक्षात कधीच का येत नाही?
किंवा, लक्षात येऊनही
त्याला देत असाव्यात त्या आयुष्याचा फेरा असे नाव
त्या आपल्या प्रत्येक भावना
आधी समजावून सांगत असाव्यात स्वत:ला
त्यामुळेच त्यांनी कमावले असावे शल्य लपविण्याचे कौशल्य
घुसमटीच्या क्षणांना मोकळे करण्यासाठी त्या
एकांतात रडून रडून होतात पावसाळा तीनही ऋतूत
संभोगात शरीरासोबत दिला जातो आत्मा
हे पुरुषांपेक्षा बाईला अधिक चांगले माहीत असावे
खरे तर संभोगाला न घाबरणारी बाई
अजून जन्माला यायची आहे
कोणत्याही क्षणी आयुष्याचे होईल शेण
याची बाईला सतत असते धास्ती
पुरुष अविश्वसनीय, धोकादायक अन हिंस्त्र असतात
याचा त्यांनी घेतलेला असतो अनुभव पावलापावलावर

लग्न झाल्यावर पुरुष बाईलाच दार बंद करायला सांगून
भाग पाडतो 'बायको' बनायला वेळी अवेळी
पुरुष सळसळतो तेव्हा बनतो किनारा नसलेला समुद्र
तर बाईच्या आत हरेक कोपऱ्यात
दडून बसलेली असते गर्दी
त्यामुळे जगाला उंबरठ्याबाहेर ठेवणे जमत नाही तिला
आरस्पानी बाई शोधता शोधता
मी पाहिलेय
अनेक पुरुषांच्या डोळ्यात फक्त बाईचे विडंबन...

▲

## मान्यच करायला हवे की

परिपूर्ण बायको अन परिपूर्ण नवरा असे दाम्पत्य
या जगात असेल यावरचा माझा विश्वास
हल्ली उडत चाललाय
सर्व काही आलबेल चाललंय
हेच दाखविण्याच्या प्रयत्नात असतो हरेक.
लग्न म्हणजे ‘फेविकॉल रिलेशनशिप’
हे मान्य करायला कुणीच धजावत नाही
परस्परविरोधी दोन भिन्न जीव जेव्हा
बांधले जातात एका धाग्यात
तेव्हा ते खरोखर असते दोन आत्म्यांचे मीलन
की, प्रजननाची सामाजिक सोय?
तसा कुणीच नसतो
मुळासकट वाईट अन् शेंड्यापर्यंत चांगला
समस्त मानवजातीचेच आयुष्य आहे उन्नीस बीस
परिपूर्ण व्यक्ती शोभून दिसते फक्त
कथा, कादंबऱ्या, चित्रपट आणि पुराणातल्या भाकड कथांमध्ये.
‘मिसमॅच’ झालेले वैवाहिक बंधन
आयुष्यभर जपायचे चार भिंतीत
शरीरसुखातून आलेल्या मुलांच्या भविष्याखातर
ही खूणगाठ नकळत बांधली जाते हतबलतेतून.
हरवलेल्या संबंधावर चिखलफेक करून
काय मिळणार आहे मनस्तापाशिवाय
याचा दोन्ही टोकांकडून केला जातो विचार कमी अधिक
पाठ फिरवताच लोकांचे कुत्सित हसू

पेलायची कुणाचीच नसते तयारी
सतत हसरा चेहरा ठेवण्याचे कसब शिकतो प्रत्येकजण
इतरांच्या डोळ्यांपासून अश्रू लपवून
चार भिंतीत मोकळा श्वास घ्यायलाही जेव्हा होतो त्रास
तेव्हा बेडरूमचेही होते छुप्या लढाईचे मैदान
नकोसा वाटतो कोरडा स्पर्श
कधीकाळी घेतलेल्या आणाभाका वाटू लागतात शाप
मनातल्या स्वप्नांचा झालेला असतो चिखल
काळ्या धाग्याचा जाणवू लागतो फास
कधीकाळी सोबत साजऱ्या केलेल्या
रम्य क्षणांचे होते विस्मरण कायमचे
मनाने अन शरीराने वरल्याची वाटू लागते
आयुष्यातील राक्षसी चूक
काही होतात कायद्याने एकमेकांना अनोळखी
काही होतात एकत्र राहून सुखाला पारखी.

एक मात्र मान्यच करायला हवे की,
विवाहबंधनात बांधले गेले तरी
- मनोमन प्रत्येक पुरुष असतो कृष्ण आणि स्त्री असते द्रौपदी...

▲

## उजेडाचा रंग

झगझगीत शहरातील ही रात्र
तिच्या उजाड कपाळासारखी भकास
पृथ्वीचं वय तिच्या चेहेऱ्यावरून ओघळणारं
तिच्या भोवतालचा अंधार अधिकाधिक गडद होत चाललेला
एका सावलीवर दुसरी
दुसऱ्या सावलीवर तिसरी, तिसरीवर चौथी
अशा अनेक सावल्यांची थप्पी तिच्या भोवताली
ती वेश्या होती की भिकारीण,
वाट चुकलेली असहाय्य स्त्री
की, मला भेटलेल्या बायकांचे एकत्रित रूप?
कुणास ठाऊक काय
पण सारेच अगम्य
तिची कुणीही वाट पहात नव्हते
ती कुणाची वाट पाहतेय हेही कळत नव्हते
बाई असूनही तिने खोवल्या होत्या कमरेला
पुरुष जातीच्या सतरा पिढ्या
माझ्यातील पुरुषाला ओलांडून
ती नागडा करीत होती भूतकाळ
भविष्याची नसावी तिला चिंता
अन् वर्तमान तर ती तिच्या अटींवर जगतेय असे वाटत होते
तिला माझ्यात दिसत असावा
या शहराच्या दरवाजात सोडून गेलेला बाप
किंवा माझ्या जागी पारा उडालेला एक अदृश्य आरसा
ज्यात तिला धुंडाळायचे असावे ब्रम्हांड

आयुष्यात फक्त रात्रीच पाहिलेल्या ती
माझ्या हातातील कवितेच्या पुस्तकात
ओळीगणिक प्रत्येक शब्दात
स्वत:ला तुकड्या तुकड्याने पाहण्याचा प्रयत्न करते
मला वाटले ती म्हणेल,
ऐकव तुझी एखादी नवी कविता
अथवा कर म्हणेल,
कधी फिटतील दु:खाचे भोग याचे भाकीत
तिने इतकेच विचारले -
'उजेडाचा रंग कसा असतो रे सायबा?'

▲

## कोण हा पुरुष?

कोण हा पुरुष जो मला अस्वस्थ करून
माझ्याच पुढ्यात बसून थेट माझ्या डोळ्यात पाहत
माझ्याच मेंदूत खुळखुळा वाजवीत आहे?
त्याला माझ्याशी काही तरी बोलायचे आहे
की काही सांगायचे आहे?
काही म्हणजे काही कळत नाही.
कुणी आतून चिमटीत पकडून ठेवला आहे त्याचा आवाज
म्हणून तो खुलेपणाने होत नाही व्यक्त?
माझ्यातली आधुनिक बाई की त्याच्यातला आदिम पुरुष
त्याला थोपवित आहे माझ्यापर्यंत येण्यापासून?
त्याला नक्कीच टाकायचे नसतील फासे
माझ्या सौंदयाची अवास्तव स्तुती करून
माझ्या आवडी निवडींची मनातल्या मनात
गोळाबेरीज करून
करायची नसावी भावनिक सौदेबाजी
त्याला झोंबायचेही नसेल माझ्या शरीराशी एका रात्रीपुरते
किंवा द्यावयाचेही नसेल आध्यात्मिक प्रवचन मोक्षप्राप्तीपर्यंत
कदाचित बोलायचे असेल गुंता झालेल्या आयुष्याबाबत
देशोधडीला लागलेल्या माणसांबद्दल
भक्तांची मांदियाळी आणि बुवाबाजीच्या कॉर्पोरेट बिझनेसबाबत
वाढती महागाई आणि गोठलेल्या आंदोलनाबाबत
कुंडीत फुलवलेल्या बागेबाबत नि,
भिंतीवरील चित्रात बंदिस्त केलेल्या चांदण्यांबद्दलही.
त्याच्या डोक्यात नेमके काय धुसफुसत असेल यावेळी?

बायकोने दिलेली सामानांची लांबलचक यादी
की, प्रेयसीने केलेली नेहमीची कटकट
ऑफिसमधील वाढते काम, वरिष्ठांची खुन्नस
अन् नुकतेच लग्न झालेल्या बहिणीची चिंता.
की,
सगळ्यांच्याच आयुष्याचे गोणपाट झाल्याने
तो झाला असेल अस्वस्थ.
शिजत असेल का त्याच्या डोक्यात व्यवस्थेविरुद्ध कट?
मुंगीच्या मेंदूतला डोंगर पोखरून
मी असं काय शोधू पाहत आहे न सापडलेलं?

एक मात्र नक्की,
प्रत्येक अनोळखी पुरुष मादी पाहताच बनतो नर
असे नाही
अजूनही माणसात माणूस जन्म घेतोच की...

▲

## पहिली भेट

पहिल्यांदाच
अचानक आपली पहिली भेट आठवली.
उन्हाने भाजून काढणारी टळटळीत दुपार
घामाघूम झालेले रस्ते
धावपळीत कोमेजलेली माणसं
रेल्वे स्थानकाच्या लोखंडी पुलावर मी उभा
प्रत्येक चेहेऱ्यात तुझा चेहेरा शोधणारे डोळे घेऊन
पाठीवरून माणसांची वर्दळ चालू असताना
तू पुढ्यात आलीस अनेक प्रश्न घेऊन
भरदुपारी फुलांच्या पावलांनी
चांदणं होऊन विखुरलीस माझ्या अवतीभोवती
अन मी उद्गारवाचक चिन्हासारखा स्तब्ध उभा.
ही आपली पहिली भेट
पुन्हा कधी न भेटण्याचा प्रारंभ ठरली.
जुजबी संभाषणानंतर
नाक मुरडलेला कुत्सित भाव ठेवून
तू पाठमोरी होऊन दूर दूर जात राहिलीस
मी तुझ्या पाठमोऱ्या पुसट आकृतीमधून
सर्वदूर उडून जाणारी पाखरं पहात.
तू उभी होतीस त्या भारलेल्या जागेवर
मी कितीतरी वेळ उभाच होतो
कुणीतरी चेटुक केल्याचा भास अनुभवत
तू उभी होतीस त्या जागेची धूळ
कपाळाला फासण्याइतका

नादान तर मी नक्कीच नव्हतो
नंगा फकीर होतो तरी
गुडघे टेकणे कधीच जमले नाही आयुष्यात.
तू आता मुला-बाळांत रमली असशील
नाही तर
वेळकाळाला पाबंद नसलेलं भांडण
करीत असशील हक्काच्या नवऱ्याशी
नाही तर
काळे मणी घालून तयार झाली असशील
विनयभंग आणि बलात्कार पचवायला
नाही तर
घटस्फोट घेऊन 'लीव इन रिलेशनशिप'मध्ये असशील
नाही तर प्रत्येक रात्री नटून नव्या नव्या जोडीदाराच्या शोधात असशील
नाही तर
अविवाहित राहून चळवळीत झोकून दिले असशील
नाही तर
स्थायिक झाली असशील कोणत्या तरी बेटावर
नाही तर
मरून गेली असशील.
नाही तरी शक्यतांची कवाडं सताड उघडीच असतात.
मी अजूनही आहे जगात कोडग्यासारखा
अन्
माझ्या दुःखाचं वय वाढतच चाललंय दिवसागणिक...

▲

## दु:खायण

कळत्या वयापासून
अशिक्षित आई - बाबांनी दिले मला धडे
प्रत्येक गोष्टीत आनंद शोधण्याचे.
पण नाही जमत
दु:खाला वाकुल्या दाखवणे
दु:ख नाही एन्जॉय करता येत चारचौघात.
दु:खायणानंतरच
का नेहमीच लंगडत लंगडत येतं सुख
प्रत्येक वेळी अग्निपरीक्षा मागत?
जगण्याचाच एकूण झालेला चोथा
अन् रगडा बनून गेलेले आयुष्य सांभाळताना
इतरांचा आनंद पाहून त्यात सुख शोधताना
आपण हलके होतोच असे नाही.
सुख नसते ब्लू फिल्म चार घटकांची
आपल्या दु:खाचे वजन नेहमीच असते जड
गर्दीत एकटे असताना होतो साक्षात्कार
आपली वाटणारी माणसेही लपतात चेहऱ्याआड.
दु:खाची नस कापून टाकणे नसते सोपे
जखम भळभळतच असते आतल्या आत.
मी शोधतोय
देहाच्या जोडगोळीऐवजी
बोटांचा निसटता हळवा मोरपंखी स्पर्श!
मला लपवून ठेवायचे आहे काही काळ प्रकाशाला अंधारातच...

▲

## उदास रात्री काळाच्या प्रवाहातील गाणे

अस्पष्ट चेहेऱ्यांच्या गर्दीत
तुझा चेहेरा ओळखीचा वाटू लागतो.

सगळ्याच बायकांचे मुखवट्याआतील चेहेरे
एकसारखे दिसतात
त्यांचा एक पाय असतो टिकलीचा
दुसरा असतो कुंकवाचा
प्रत्येक बाईला जमत नाही बाहेरख्यालीपणा
म्हणून त्या सहन करतात हरेक रात्री
नवरा खेळत असलेला शरीराचा खेळ.

सतत तोल सावरत जगण्याला चिकटलेला असतो
अशिक्षित मनाचा भाबडेपणा
डोळस प्रेमाला लागते नजर
चाळण झालेल्या आयुष्यातही त्या
मांडून ठेवतात जगण्याचा पसारा
आवराआवर करतात स्वत:च्या भावनांची, स्वप्नांची
पुरुषांची मर्जी सांभाळता सांभाळता
त्या बाजूला सारतात स्वत:चा उत्कर्ष साधण्याचे कष्ट
सनातन संहितेला बट्टा लागू नये म्हणून
आपले मन मारून
जागणाऱ्या रात्रींना सांगत बसतात दु:ख.

प्रेम आणि लग्नाच्या पलीकडे बायका पाहत नाहीत डोळाभरून

दिसले त्या फटीतून त्या पाहतात आभाळ नि निसर्ग
त्या शिकतात अनेक गोष्टींकडे दुर्लक्ष करायला
आठवणीच बनतात त्यांच्या जगण्याचा एक भाग
स्वत:ला समजू लागतात अकाली प्रौढ
नवऱ्याचे कर्तृत्व नि मुलाबाळांचे भवितव्य
यावरच असतात बेहद्द खूष
सहधर्मचारिणी समजून लावून घेतात जीवाला घोर
सामील होतात भावनांच्या प्रेतयात्रेत
त्यांच्यासाठी घर बनते गुलछबु स्वप्नांचे
एनलार्ज केलेले रूप
मग त्यांना दिसत नाहीत त्यांचे भीक मागणारे रिकामे हात.

बहुतांश बायका बनून राहतात
उदास रात्री काळाच्या प्रवाहातील एक गाणे ...

▲

## कधी जमणारच नाही का?

मनानं चोर अन शरीरानं पवित्र असलेली तू
अपलं उघडेपण झाकण्यासाठी
डोळे मिटून घेतेस
खुडतेस आपल्या आंधळ्या ओढीचे पंख
संपूर्ण शरीराचे आवळून ठेवतेस गाठोडे
आपल्या दोघांच्या दरम्यान समुद्र उधाणतो तेव्हा
पांघरतेस बुरखा घातलेली लाज
नि, मी
तुझी नक्षत्रगोंदली काया पहात
रात्रीला उद्देशून कविता म्हणतो.
तू कितीतरी वेळ
आरशात स्वत:ची प्रतिमा न्याहाळत बसतेस
आकाशाचे सर्व दरवाजे उघडतात
पाखरांना पंख फुटतात
जमीन हादरते आतल्या आत
नद्या होतात प्रवाही
वारा पळतो सैरावैरा दिशाहीन
किनारा नसलेला समुद्र ओलांडून
आपण येतो स्वर्गाच्या दारापर्यंत
तू थबकतेस
मी थांबतो
नंतर सर्वकाही पूर्वीसारखेच जग
अवघडलेले...

...जगाला बाहेर ठेवणे आपल्याला कधी जमणारच नाही का?

▲

# लोढणे

दमून भागून घरी आल्यानंतर सवयीप्रमाणे
बायको काढून ठेवते मंगळसूत्र
आता तिला हलके हलके वाटत असावे...

रात्र अन माझ्यामध्ये स्वत:ला जागा करून घेतल्यानंतर
रात्रभर ती तिचीच असते
दुसऱ्या दिवशी पहाटेपासून घरातल्या कामाचा पसारा आटोपून
घाईगडबडीत कामावर निघताना
ती आठवणीने शोधत बसते मंगळसूत्र घरभर
हक्काने मलाच सांगते शोधून द्यायला
अशावेळी मीच मला शोधत असतो...

कौतुकाचा दुष्काळ आणि परिचयाचा अतिरेक डोळ्यात साठवून
मीही शोधत राहतो तिची हरवलेली सौभाग्यचिन्हं
माझी कुंठित नाराजी बायकोच्या चेहेऱ्यावर दिसते
किंवा ती लावते माझ्या मनातल्या विचारांचा आपल्या मनाने अर्थ.

बाहेरच्या जगात मात्र
समस्त पुरुषांना आवडतो शिवाशिवीचा खेळ
त्यामुळे आपण मोफत घरपोच जाणार नाही
हे माहीत असल्याने ती नाकारते लिफ्ट
लंपट पुरुषांकडे कानाडोळा करण्याची ताकद
मिळालेली असते तिला मंगळसूत्रामुळे.
शेवटी कसाही असला तरी नवरा असतो सोबत

अदृश्य सुरक्षित भिंतीसारखा काळ्या मण्यांच्या रूपात.

की -
मंगळसूत्र करते ढवळाढवळ व्यक्तित्वात?
आत्मविश्वासाला करते लुळे पांगळे?
गडद करते परावलंबी जाणीव?
कुणाच्या तरी स्वामित्वाचे बिरुद बनून
बनते अभिमानाने मिरवणारे मालकीहक्काचे ओझे?
बायका स्वखुशीने सहज अडकवून घेतात गळ्यात
रुढी आणि परंपरेचे लोढणे?
की -

▲

# पुरुषघाणी

ती बाई होती म्हणून
तिला समस्त पुरुष जातीचा तिटकारा होता
जन्मदात्या बापासहित.
तिने पाहिला असेल भूतकाळाचा बीभत्स चेहेरा
कळत्या वयात कळले नसतील तिला
पुरुषी हातालाच फुटलेल्या डोळ्यांचे स्पर्श
अथवा जाणवली असेल
शरीराला येत असलेल्या फुगवट्यांवरून
घरंगळत जाणारी सर्पलाळ
अथवा पाहिलाही असेल अर्धझोपेत
आपल्या आईवर आरूढ झालेली बाप नि,
सकाळच्या प्रतीक्षेत रात्रभर कण्हणारी रात्र.
शाळेत मास्तरांनी गिरवली असेल शरीरावर बाराखडी
अथवा वर्गमित्राने कोपरा गाठून
केली असेल झोंबाझोंबी
पदर आल्यावर शरीराला धुमारे फुटताच
हवाहवासा वाटणारा मायेचा पुरुषीस्पर्श
करून गेला असेल रक्तबंबाळ ओरबडल्यामुळे.
नोकरी लावण्याच्या मदतीखाली कुणा बाप्याने
लावला असेल चारित्र्याला बट्टा
प्रयत्न करूनही धजत नसल्याने
बॉसने रोखून धरले असेल प्रमोशन
मारला असेल जाता येता धक्का.
यातले काही तरी घडले असावे.

आपल्या देशात काहीही घडू शकते...

जेव्हा बाईला येतो स्वत:च्याच देहाचा वास
स्वत:ला आरशात नागडे पाहताना वाटते लाज
पुरुषाचा स्पर्श जाणवतो किळसवाणा
मनाची होते पडीक जमीन, बर्फाळतात संवेदना
तेव्हा सर्वच पुरुषांना करावे लागते एका रांगेत उभे.
खरे तर,
स्तनधारी प्राण्यातील नरालाही असतात स्तन
पूर्ण नर नसतोच मुळी अस्तित्वात
पुरुषातही असते अर्धी स्त्री.

-मी आता स्वत:लाच चाचपून पाहतोय तिच्या डोळ्यात...

▲

## पेटलेल्या माणसांच्या कोलाहालात

स्वत:चा चेहेरा उतरवून ती
माझा चेहेरा चाचपडत येते
वाट काढीत काढीत
पेटलेल्या माणसांच्या धुमसणाऱ्या कोलाहलातून
थेट या शहराच्या दुखऱ्या वस्तीत.

तिच्या वैतागाची नि, माझ्या वेदनेची
घटकद्रव्ये एकच असल्याने
आता,
माझ्याप्रमाणेच तिलाही आलेला आहे
गर्दीचा चेहेरा.

आम्ही दोघे
हे शहर अन् माझी वस्ती
या दरम्यानची रेषा पुसट करण्याच्या प्रयत्नात.

पेटलेल्या माणसांच्या धुमसणाऱ्या कोलाहलात
अजूनही,
तिच्या बांगड्यांची किणकिण ऐकली की,
माझ्या डोळ्यांची पाखरं भिरभिरतात
पूर्वीसारखी...

▲

## सत्यामागे दडलेले सत्य

घरी मित्र येणार म्हणून मी
सहज दिसणार नाहीत अशा जागी ठेवतो
बायको आणि मुलीची घरातल्या घरात सुकत घातलेली
सर्व अंतर्वस्त्रे
ब्रा, चड्ड्या वगैरे...
माझा अंडरवेअर तसाच लोंबकळत असतो दोरीवर
मी असे का करतो अनपेक्षितपणे
याला नाही समर्पक उत्तर माझ्याकडे
सर्वचजण असे करतात म्हणून असेल कदाचित.
डोळ्यांप्रमाणे स्थळ, काळानुसार
कपड्यांचेही बदलत असावेत संदर्भ
अन् दिसू लागत असावा अंतर्वस्त्रांमधील नागडा माणूस.
आपण सर्वच फिरत असतो सर्वत्र
आपापले लिंग सोबत घेऊन
मग कोण शिकवते शहाणपण
जन्माला घालणाऱ्या मांसल अवयवाला झाकून ठेवण्याचे?
संस्कृती, नीतिमत्ता, रूढी, परंपरा, धर्म की मनुष्यत्व?
मग लहान मुले, तान्ह्या बाळाला दूध पाजणारी माऊली,
कुंभमेळ्यातील नागा साधू
मात्र दिसत नाहीत अश्लील
डोळ्यांच्या खिडक्या बंद केल्या की,
दिसू लागत असावी अब्रूदार नैतिकता
नि, मिटला जात असावा पवित्र प्रकाश आतल्या आत
कदाचित

अश्लीलता पाहणाऱ्याच्या डोळ्यात असते
की डोळ्यांच्या वर ठेवलेल्या डोक्यात?
खरं तर
समजून घेण्याऐवजी आपण
गैरसमज करून घेणे पसंत करीत असू
सत्यामागे दडलेलं सत्य जाणून घेण्यास
आपल्याला मिळत नसावी सवड
आपण बिलोरी जखमा बाळगत
वाट पहात असू मानवाच्या पुनरुत्थानाची.
मोठ्या नाकाने बोलणारे आपण
अशावेळी तोंडच उघडत नाही...

▲

## बायकांना...

बायका नाजूक आणि असतात मुळातच हळव्या
त्यांना लपविता येत नाहीत अश्रू सराईतपणे
आपुलकीच्या चार शब्दांनी त्या होतात पाणी पाणी
स्तुती नेहमीच त्यांच्या पक्षात असते
त्या ओवाळून टाकतात जीव जीवाला जीव देणाऱ्यावरून
जीव गोळा करून त्या होतात तयार समर्पणासाठी
अशावेळी त्या अंगावरून गडगडू देतात हत्तींच्या झुंडी.
बायकांना हवा असतो त्यांच्यासारखाच नवरा
जो पुरुषीपणाची झूल टाकून वागतो मित्रासारखा
समजून घेणारा, कौतुक करणारा, साधा-भोळा, प्रसंगी वेंधळा
ज्याच्या गुलजार स्मिताने
प्रकाशात उजळून निघावे देहाचे झाड
तो असावा भरून आलेले डोळे पुसणारा हात
चुका समजून घेणारा पदर
त्याच्या सहवासात मिळावा सुरक्षिततेचा श्वास
ज्याला कळावा कंसात बोललेल्या वाक्याचा नेमका अर्थ
ज्याच्या प्रेमाचं पोतं कधीच होऊ नये रिकामं.

बायकांना आवडतं पुरुषांना खाऊ-पिऊ घालणं
तो नवरा असो,
प्रियकर असो,
अथवा असो एक मित्र.

अन् पुरुष तर अख्खी बाई खायला बघतो!

▲

## या बायका

या कोणत्या ठिकाणी तू मला घेऊन आलीस?
हा रिसॉर्ट नाही
किंवा नाही एखादं पर्यटनस्थळ
येथे तर
जगणं माहित नसलेल्या बायका सभोवताली
प्रत्येकीची कहाणी कादंबरीत न मावणारी
त्या चालताना जेथे जेथे ठेवतील पाय
त्या त्या ठिकाणी उमलेल एक एक फूल
नि फुटतील निर्मळ झरे
अंधाऱ्या रात्रीतही त्या
आपल्या येण्यानं करू शकतात सकाळ
हे त्यांना कुणी कधी सांगितलेलंच नसतं
प्रचंड भूक लागलेली असतानाही
त्या मात्र धरतात प्रेमाची आस
कुणीतरी जवळ घ्यावं करकचून
आणि नुसता मायेनं हात फिरवावा सर्वांगावर
या एका आशेवर त्या कंठतात सर्व आयुष्य
आयुष्यातील कोणताही निर्णय घेताना
त्या डोकावत नाहीत आत
तुटलेल्या खेळण्याशी बसतात खेळत
जन्मापासून सीता बनलेल्या या बायका
राधा बनण्याची वाट पाहत
मीरा होऊन जातात त्यांच्या नकळत
मृत्युच्या दरवाजातही त्या

नवऱ्याच्याच नावानं करतात धावा
कोणत्या संस्कारानं जन्म दिलाय या बायकांना?
त्यांचेच खांदे कसे मिळतात
सर्वांना बंदूक चालवायला?
ही कोणती झाडं आहेत उन्मळून पडलेली सर्वत्र
जी दिसतात त्यांच्यासारखीच?
पाठीवरील झोळीत मूल बांधून
त्या कुठं चालल्या आहेत कोयता कमरेला खोचून?
निंदणी - खुरपणी करायला
की आयुष्य समजून घ्यायला?
त्यांच्या काळजातली प्रेमाची
अन् चेहेऱ्यांवरील पोटातली भूक
किती दयनीय दिसतेय
माझ्या मध्यमवर्गीय कोडग्या डोळ्यांना...

▲

# इतक्या वर्षानंतरही

तू जवळ असलीस की
विरघळून जातात मेणाच्या भिंती
तुझ्यासाठी तहानलेला असतो माझा जीव
सावलीसारखा करतो पाठराखण
तुला कधी पडू दिले नाही अंतर
तुझ्या मायेत इतका गुंतून पडतो की
नकळत कळ काढतो दु:खाची
बोचऱ्या शब्दांचे दगडधोंडे खायला
नेहमीच पुढे करतो मी कपाळ
थोपवितो अश्रूपात चारचौघात
एकटाच रडून घेतो आरशापुढं तुझ्यासारखा
या कालकोपात माझ्या डोक्यावर नेहमीच फुटतं आभाळ
तुझ्या हिशेबात मात्र नेहमीच येते खोट
तुझी न भरलेली जखम अजूनही मागतेच आहे औषध
इतक्या वर्षानंतरही
आपण समजून घेऊ शकलो नाही एकमेकांना
आणि त्यात तू
माझ्याकडे पाठ करून झोपी गेली आहेस
भांड भांड भांडून.

तुला कधी ऐकू येईल मी मोडून पडल्याचा आवाज?

▲

## मासे साफ करताना...

कांदे - बटाटे आणि भाज्या बायको आणते
ऑफिसवरून येताना
मासे नि मटण मात्र मलाच आणावे लागते
सुट्टीच्या दिवशी
मी मासे छान साफ करतो असं बायकोचं मत.
मासे साफ करताना
पुरुष असूनही मी भोगतो बाळंतपणातील वेणा
खूप प्रॅक्टिकल माणूस असल्यानं
दार अडवून बसलेली भूतदया
माझ्यापर्यंत कधीच येऊ देत नाही
हा भाग अलाहिदा.

मासे साफ करताना आधी मी
हातात सुरा घेऊन
खवले काढतो खरवडून
कोंबडीची पिसं सोलल्यासारखी
मग कल्ले, शेपटी आणि काटे खुडून काढतो
नंतर पोटात सुरा खुपसून
बोट वाकडं करून
बाहेर काढतो आतडी, हृदय, फुफ्फुस
माशांनीच गिळलेले लहान मासे,
अन् लहान लहान अंडी.
माशांच्या खोबणीतून डोळे बाहेर काढताना
मीच मिटून घेतो माझे डोळे

ज्यांनी पाहिलेल्या असतात अनेक वाईट गोष्टी
अन् शिकविलेलं असतं कानाडोळा करायला.

माणसांच्या मनातली, डोक्यातली घाण
अशीच काढता आली असती तर
प्रत्येकजण झाला असता ताजातवाना, टवटवीत.

मेलेल्यांना मारणं
आपल्याकडं गुन्हा ठरत नाही
मेलेल्यांना मारुनच अनेक लोक
प्रतिष्ठित आणि धनवान झालेत
आणि आता तर
जिवंत अन् मेलेले यात सडपातळ फरक उरला आहे.

बायकोला आवडतात गाभौळ्या
मुलीला आवडतं डोकं
मला आवडतं काटे अन् हाडं चावून खाणं.
प्रत्येकाचीच असते आवड वेगवेगळी...

- भूक माणसाला किती निर्दयी बनवते आपल्यासारखीच!

▲

## पुरुषांच्या सावलीमागे लपलेल्या बायका

कोणत्याही बाईला पाहिलं की
आजूबाजूचं सर्व काही सुंदर दिसू लागतं
मी अष्टांगानं दर्शन घेतो
पुरुषांच्या सावलीमागं लपलेल्या बायकांचे.

या बायका रोज नव्या नव्हे तर
रोजच्याच सुखात रमलेल्या असतात
चेहेऱ्यावर अजिजी थापून
चिमूटभर जगून मूठभर मरतात
त्यांची झोळी नेहमीच मोठी असते.
आवडलेला पुरुष 'नवरा' करण्यासाठी
झटणाऱ्या या बायका
विसंवादी पात्र घेऊन आपला संसार रेटत असतात
अन्
'नवरा' शब्दात सुरक्षितता शोधता शोधता
गळ्यात काळे मणी अडकवून
तयार होतात सर्व काही सोसायला.

बिछान्यात मात्र त्यांना
पुरुष आक्रमक झालेलाच आवडतो...

▲

## पहाट होण्याआधी

आगंतुक स्वप्ने घालत आहेत हैदोस
अन डोळ्यांना झालाय पापण्यांचा भार
पृथ्वीचे वाढत चाललेय वय नि
चवचाल सूर्यालाही फुटलीय मिशी
मातीचा घमघमाट आसमंतात
नद्यांचा आटलाय पान्हा
डोंगर बसले आहेत शांत
फतकल मारून शहाण्यासारखे
चुकार पक्षी दाखवताहेत वाकुल्या
पदर आलेली झाडे सळसळताहेत
बावचळलेला बेभान वारा
शीळ घालून होतोय परागंदा
अतृप्ततेच्या वाटेवरून
मन हिंडतेय दिशाहीन
मीही अदृश्य शक्तीच्या खांद्यावर भार टाकून
जगू पहात आहे निर्धास्त, निवांत
अजूनही,
माणसांच्या चांगुलपणावरील
माझा विश्वास उडालेला नाही.
पहाट होण्याआधी डोळे उघडायला हवेत ...

▲

## व्हर्जिन बेट

एक छानसं निर्जन बेट असावं
ज्यावर असतील डोंगर, झरे, झाडी-झुडपं, पशु-पक्षी
अन् डोक्यावर निरभ्र कोरं आकाश
या व्हर्जिन बेटाला
झालेला नसावा कुणा मानवाचा स्पर्श आपल्याखेरीज.
बेटावर नसावे घड्याळ, कॅलेंडर, लॅपटॉप, मोबाईल
जगण्यासाठी असावा वेळच वेळ
नसावेत मंदिर, मसजिद, चर्च, गुरुद्वारा
अन् विहार
नसावा देव नावाचा अदृश्य धाक
अज्ञाताची भीती दाखवून
नसावे नीतिमत्तेचे धडे देणारे कुणी
नकोत जाती-धर्माचे नागरिकत्व कुणाकडे
असावा गवताचा रंग हिरवाच
आभाळाचा निळा
अंधाराचा काळा
रात्रीचा जांभळा
आणि माणसं असावीत तांनापिहिनिपांजां
देवालाही देवपण देणारी.
आपल्या बेटावर
सुऱ्यासारखा कुणीच नसेल कुणाच्या मुठीत
'चालायचंच' अशी समजूत करून नसेल कुणाचंही जगणं
कुलूप नसलेल्या घरांतून
नांदेल विश्वास घरच्यासारखा.

ही त्रिकाल स्वच्छ हवा आहेच
निसर्गासोबत मुक्त जगण्यासाठी
माझे फैलावलेले हात होतील तुझे घरटे
तुझे डोळे असतील माझ्या मुक्तीचा मार्ग
सुखाचा चेहेरा असेल आपला आरसा
आपल्याला दिसेल नेहमीच दु:खाची पाठ
जी केवळ बोलते प्रेमाची बोली
ती आपण शिकू पाखरांची भाषा
अन् घडवू येणाऱ्या पिढ्यांसाठी
ओरखडाही न उमटलेलं
जगावेगळं जग.

... कपड्यांचे काय करायचे ते दोघे मिळून ठरवू!

▲

## सहज

मेंढी फिट असतानाच ओपनला सत्ता मारल्यासारखे
नि, वेधशाळेने हवामानासंबंधी भविष्य वर्तविल्यासारखे
माझे अंदाज इतके फसवे निघतील
हे अपेक्षित नव्हते.
म्हणून तर मी सरळ सरळ सांगून टाकलं होतं प्रेम
प्रेम-
दोन ढेंगामधली आग. नि,
सुख-दुःखाबद्दलची अंडरस्टँडिंग.
पण तू त्याला गोंजारत बसलीस
उदात्त जीवनाचं आदित्यकरण समजून.

किती सहज तू माझ्या मैफलीतून वेगळी झालीस
जसा फाशीची शिक्षा ठोकून वेगळा होतो न्यायाधीश.

तू जन्मतःच तुझ्या कळपातून घेऊन आलीस जात-खुर्दा
मी मात्र आलो नागडाच
नव्हता माझ्याजवळ देश, नव्हता धर्म,
नव्हते वाडवडिलांचे डबोले.
म्हणूनच तुझ्या कुंडलीत कदाचित
जुळून आले नाहीत माझे खग्रास ग्रह.

अगं, कसे सांगू तुला
माझ्या रस्त्या-रस्त्यावर पावलागणिक मौजूद खळाया-खोंगळाया
अन् प्रत्येक झोपडीत लॉकअप केलेला अनाथ आक्रोश.

असे असूनही मी देणार नव्हतो तुला
स्वप्नांचे पैगाम घेऊन दु:खाची आवतणे
नि, फोडणारही नव्हतो तुमच्या देवादिकांच्या पत्थरी मूर्त्या
गझनीचा महंमद बनून.
फक्त सांगणार होतो "सायंटिफिक् आऊटलूक" तुला
कारण, या पृथ्वीचेच करायचे आहे समान वाटप आपल्याला.
तरीही अशा गाफिल क्षणी काफर बनून
तू समजत राहिलीस आमच्या माथ्यावरील श्रमाच्या थेंबाला
तुमच्या प्रस्थापितांच्या मेहरबानीचा मोती!

किती सहज तू माझ्या मैफलीतून वेगळी झालीस
जसा फाशीची शिक्षा ठोकून मोकळा होतो न्यायाधीश

▲

## आंघोळ न केलेला पाऊस...

पाऊस मला कधी भावलाच नाही.
हरेक पावसाळ्यात मी कोरडाच राहतो.

पाऊस कोसळू लागला की माझ्या डोळ्यात येतात अनाहुत अश्रू...
लहानपणापासून मी कधीच मारल्या नाहीत उड्या
येरे येरे म्हणत
कारण बापाच्या रोजंदारीचा व्हायचा चिखल पावसाळ्यात
अन् आमचे आयुष्य व्हायचे तुंबलेले गटार.
झोपड्यात साचायचे तळे
तेव्हा घ्यायचो मी तटबंदी इमारतीचा आडोसा
समदु:खी मित्रांसोबत रात्रभर.

मला आजही दिसतात
आईने लुगड्याने पुसलेले आम्हा भावंडांचे चेहेरे
गालावरचा तिचा मायाळू मुका
बाबांनी गळणाऱ्या छताकडे पाहत दिलेला आश्वासक धीर
लहानग्या भावाचे म्हातारे बालपण
थोरल्या बहिणीच्या ओल्याचिंब छातीतून
सांडत चाललेले तारुण्य
रिकामी भांडी खरवडणाऱ्या घुशी आणि उंदीर
सोसाट्याच्या वाऱ्यात
विझणारा दिवा पुन्हा पुन्हा पेटविणारे आमचे हात
नि,
उजळणाऱ्या उजेडातील आमचे अश्मयुगीन दारिद्र्य.

मान्य की,
पावसामुळे गर्भार राहते जमीन
नि, पुढे सरकते जीवन
पण भुकेपुढे झक मारते तत्त्वज्ञान
या पावसामुळेच आम्ही झोपायचो उपाशीपोटी
पोटाला कळते फक्त भाकरीची भाषा
नादान पावसाला कळली असती ही भाषा
तर तो कधीच वाहिला नसता गरीबांच्या डोळ्यात.

आजही
दहा-बारा भिंतीच्या माझ्या तटबंदी घरात
पाऊस सुरू होताच मी लावून घेतो दारे-खिडक्या
अन् आठवतो झोपडीच्या छतातून गळणारा पाऊस.
पावसाच्या भीतीचा खिळा
दिवसेंदिवस अधिकच रूतत चाललाय काळजात.
त्याचवेळी,
माझी मुलगी हात पसरवून तळहातावर झेलते पावसाचा मोती
तेव्हा मला ती इंद्रधनुष्यात न्हाऊन गेलेली दिसते.
अशावेळी मी दिसू देत नाही तिला
माझ्या डोळ्याआडचा आंघोळ न केलेला पाऊस.

▲

## जंगलात लढणारे

त्यांनाही आवडतात रंगीबेरंगी फुले आणि रंगवलेले आभाळ
त्यांच्याही डोळ्यात तरळते पाणी फुलपाखराला इजा झाल्यावर
त्यांनाही येते आठवण आईच्या मायाळू कुशीची
त्यांनीही स्वप्नात रेखाटले आहे स्वर्गाचे दार
भणभणत्या चुलीवर जेव्हा परतवली जाते भाकर
तेव्हा त्यांना दिसते कुपोषित चेहऱ्यावरील स्मितरेषा
या आनंदासाठी ते मोठ्या खुशीने होतात कुर्बान
त्यांना पुसून टाकायची आहे भीती
एका माणसाची दुसऱ्या माणसाच्या मनातून
मिटवायची रंग आणि लिंगभेदाची ओळख
घट्ट करायचे आहेत माणसा-माणसातील तुटलेले नाते
सुरक्षित, सदृढ समाजासाठी करायचे आहे
पोलिस, डॉक्टर, वकील या पेशाचे उच्चाटन
घडवायचे आहेत शिक्षक, विचारवंत, शास्त्रज्ञ,
कलावंत आणि कवी
त्यांना द्यायची आहे प्रत्येक चिमुकल्या हातात पाटी पेन्सिल
प्रत्येक हाताला काम आणि पोटाला भाकर
पुसून टाकायची आहे कायमची शाळेच्या दाखल्यावरून जात
देव नावाच्या भुताला कायमचे करायचे आहे
मंदिर, मशिद, विहार, चर्चमध्ये टाळेबंद
उखडून टाकायचे आहेत विविध रंगांचे झेंडे तिरंग्याव्यरिरिक्त
चिरेबंद वाड्यांना हादरे देता देताच ते
डोळे पुसून घालतात हक्काच्या जाणिवांचे काजळ
त्यांना लिहायचा आहे नव्याने खरा इतिहास

ते नाकारतात बुंदकीच्या सावलीतले सुख
ते नाकारतात जुलमी व्यवस्थेचे नियम
त्यांनाही वाटते किळस उष्ण रक्ताच्या वासाची
मजा म्हणून ते काढत नाहीत कोथळे बाहेर
माथ्यावरील भविष्य आणायचे आहे त्यांना मनगटात
त्यांना घालायची आहे जमिनीची व्यवस्थित घडी
नद्यांना वळवायचे आहे तहानेकडे
जंगलाना करायचे आहे घनदाट
शहरांना करायचे आहे समंजस आणि माणूसलोभी
माणसाचे एकूण जगणे करायचे आहे संथ आणि सुटसुटीत
संसदेत बसलेल्यांच्याही हाती द्यायचा आहे नांगर
कुदळ-फावडे, नट-बोल्ट, पुस्तक आणि संगणक घेऊन
नव्याने करायची आहे देशाची डागडुजी
हातात फूटपट्टी घेऊन त्यांना करायचे आहे
पृथ्वीचे सामान वाटप
खोडून काढायच्या आहेत जगाच्या नकाशावरील देशांच्या सीमारेषा
ते मानतात आपलाच विजय
जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात अन्यायाविरुद्ध लढणाऱ्यांचा
तुम्ही निदान
त्यांच्या प्रकाशाच्या मार्गात तरी आडवे येऊन नका
त्याच्या स्वप्नांवर पडू द्या लख्ख उजेड...

▲

## आठवण

आठवण असते हृदयातील कळ
झुळूकीनंतरची उन्हाची झळ
पाखरांचे चोचीतलं गाणं
भिकाऱ्याच्या हातातून सांडलेलं नाणं
कधी असते अश्रुंची माळ
तर कधी झोपेत हसणारं बाळ

आठवण असते न आलेलं पत्र
खांद्यावर मान टाकून रडणारा मित्र
पाढे पाठ करणारं आदिवासी पोर
कुमारिकेच्या मनातला थुईथुईणारा मोर
कधी असते अवकाशातली पोकळी
तर कधी हसणारी फुलाची पाकळी

आठवत असतं आईच्या कुशीतल्या उबेचं नाव
जागोजागी सुख विखुरलेलं स्वप्नातलं गाव
आत्महत्येच्या टोकावर नेणारी उदासी
गुन्हा न सांगताच दिलेली फाशी
कधी असते बोटाला चिकटलेले फुलपंखी रंग
तर कधी आठवणींच्याच रंगात रंगलेली दंग

▲

## डाव्या बोटावरील दुर्भाग्याचा खिळा...

कुणाच्या तरी नावाने काळे कुंकू बोटावर लावून
मी एका दिवसासाठी मिरवत बसणार आहे माझे सौभाग्य
मग पुढची पाच वर्षे पुन्हा विधवेचे आयुष्य
नव्या नवऱ्याच्या शोधात ...
कायदेशीर सज्ञान झाल्यापासून
मला शिकवलेय हक्क बजावण्यासाठी
कर्तव्य पार पाडायचे
पण अधिकार मात्र मागायचा नाही.
लुटारुंच्या टोळीतील त्यातल्या त्यात सज्जन चोर निवडायचा
पूर्वीपेक्षा कमी नागावलो यात समाधान मानून
अभिमानाने 'मेरा भारत महान' म्हणायचे.
टीव्ही, वर्तमानपत्रातून विकसित झालेला देश
आपला समजून अभिमानाने मान ताठ करायची
अन् महागाई वाढली म्हणून
नशिबाला दोष देत बोटे मोडायची.
हे नेहमीचेच...
हेही शिकवलेय की,
सगळ्याच समस्यांवर लागू पडतो 'देव' नावाचा उतारा
त्यासाठी गाठायचा एखादा बाबा
अथवा भोग समजून भोगायचे आयुष्य.
खरे तर खूप सोपे असते
जगणे आयुष्य सुटे-सुटे करून.
गरीबाला उपभोगताच येत नाही सलग अभंग जीवन
पाप-पुण्य, नीती-अनिती, रुढी-परंपरा, धर्म-कर्म, स्वर्ग-नरक

या गोतावळ्यात भरडून निघाल्यावर
कुठे मिळतो वेळ स्वच्छ आयुष्य जगण्यास?
या पंचवार्षिक फसव्या स्वप्नांच्या मोसमात
मीही ठोकून घेतलाय
डाव्या बोटावर दुर्भाग्याचा खिळा...

▲

# भुकेची भाषा

न बोलताच जी समजते पोटतिडकीने
ती भुकेची भाषा आहे आंतरराष्ट्रीय.
सर्वव्यापी भुकेचे गणित सुटत नाही चुटकीसरशी.
भुकेला नसतो कधी आराम
ती कधीच होत नाही सेवानिवृत्त
श्वासासोबत तिचीही सुरू असते दमछाक सदा सर्वकाळ.
जगातील सर्वच तत्त्वज्ञान फिरत असते भाकरीभोवती.
भूक असते मरणाच्या दारातील अंतिम सत्य
ती करीत नाही भेदभाव माणसां-माणसांत
ती सर्वांनाच फिरवते वणवण आपल्या तालावर.
भूक नसते कवितेच्या डोक्यात खोवलेले मोरपीस
भुकेला असतात अनेक चेहेरे.
तोंडे नसतो विशिष्ट रंग
भुकेची असते एकच प्रार्थना
ती लावते कुणाला देशोधडीला
तर कुणाला दुसऱ्यावर हुकूमत गाजवायला.
भूक लढते रानावनात लाल होऊन
वाहते घामाघूम कारख्यान्यात
खिजवते आरक्षणाच्या गाडग्यातून
शहरातील उकिरड्यात भूक भागवते खाज
तंगड्या फाकवून नागडी भूक उताणी पडते रंगेल रात्री.
जोपर्यंत पोटाला असते भाकर आणि वाचायला पुस्तक
तोपर्यंत सर्व असते नियंत्रणात.
अन्यथा, होऊ शकते पृथ्वीची उलथापालथ.

- भुकेमुळे पेटतात युद्ध किंवा निर्माण होतात बुद्ध...

▲

# पाखरं

आभाळ गदगदून आल्यावर
पाखरं बावचळतात
मृत्यूचा जन्म होणार असल्याच्या भीतीने सैरभेर होतात
लख्ख उजेड अन गच्च अंधार
याखेरीज त्यांना
चांगलं-वाईटाच्या ठेचा लागत नाहीत
स्वत:च्या उजेडात त्यांना
पाहून घेता येत नाही स्वत:ला
त्यांना भूतकाळ आठवत नसल्याने
आठवणींच्या दु:खायणाचा होत नाही त्रास
भणाण वाऱ्यातही ते
उचकटत नाहीत आठवणींच्या खपल्या
त्यांच्या जन्मजात भरजरी सौंदर्यालाही
कधी पडत नाही भोक
उंच उंच उडताना पाखरं
सोडून देतात स्वत:ची सावली
त्यांना पडत नाही गरज
कुणाच्याही सावल्या ओवाळण्याची
मर्जी सांभाळण्यासाठी करावे लागत नाही तोंडदेखले कौतुक
चेहऱ्यांच्या गर्दीत त्यांना
द्यावे लागत नाहीत शहाणपणाचे सल्ले
आभाळाची सावली पेलायची ताकद असते त्यांच्या पंखात
ते कशाचाही करून ठेवत नाहीत साठा उद्यासाठी
त्यांच्यासाठी आभाळ असते

त्यांच्या पंखाचे विशाल रूप
त्यांच्या आभाळावर असते त्यांच्याच स्वप्नांची मालकी
ते पाहतात सूर्याच्या डोळ्यात रोख
स्वत:च्या कल्पनेनुसार ते
जन्माला घालत नाहीत देव
पर्यायाने ते भुतांनाही घाबरत नाहीत
वेगवेगळे दिसत असले तरीही
ते वाटून घेत नाहीत रंग आपाससात
ते करीत नाहीत नैतिक श्रेष्ठत्वाची वायफळ चर्चा
पाखरं एकमेकांच्या खूप जवळ आली तरी
त्यांना दिसत नाही कुणाचीही वाईट बाजू
एकमेकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी
त्यांना करावे लागत नाही लग्न
त्यांचे शरीर कधीच उष्टावत नाही
ते झाकून ठेवत नाहीत
संस्कृतीचं लिंग लज्जेखातर
ते खेळतात खेळ तेव्हा
कुणीच हरत नाही.
- पाखरांना अजून तरी केलेले नाही "प्रोग्राम" माणसांसारखे!

▲

## त्यावेळी नक्कीच असं नसेल

आजच्यासारखं दुःख कुणाच्याच माथी थोपलेलं नसेल
जन्माला येणारं प्रत्येक बाळ हसणारंच असेल
बाळ बोबडे बोल बोलू लागताच
राष्ट्रपती, पंतप्रधानांनाही निमूटपणे त्याचं म्हणणं ऐकावं लागेल.
कोणतंच वर्तमानपत्र खून, दरोडे, बलात्कार, हुंडाबळी, घोटाळ्यांनी
नि, पोलिसांच्या खोट्या चकमकींनी बरबटलेलं नसेल.
धर्मांध हुकूमशहाच्या बेताल आदेशानं
संपूर्ण पिढी नासवली जाणार नाही.
चामड्याच्या कारखान्यात भटजी चांमडं सांधताना
नि, महार संसदेचा कारभार हाकताना दिसेल.
प्रियकराच्या खांद्यावर हात ठेवताना
प्रेयसीला आजूबाजूचा अंदाज घ्यावा लागणार नाही.
कोणत्याच वैवाहिक घराला रणांगणाचं स्वरूप येणार नाही.
राष्ट्रगीतापेक्षा नमाज, आरत्यांना प्रतिष्ठा मिळणार नाही.
देवळं, मशिदींचा वापर वाचनालयांसाठी केला जाईल.
वर्ग आणि वर्णव्यवस्थेवर
सेमिनार भरविण्याची नौबत कुणावरही येणार नाही.
सर्वच राष्ट्रांच्या सीमा पुसल्या जाऊन
सर्व जगच एक कुटुंब बनलेलं असेल.
फक्त
त्यावेळी आपण नसू.
- आपला नातू-पणतू नक्कीच असेल!

▲

## एका क्षणात

दिवसभर शिणलेल्या मनाला येते टवटवी
तू नुसता जवळ आलास तरी.
ही अनाहूत ओढ असते शरीराची की मनाची
की, गरज दोघांची?
याचा करीत नाही मी विचार कधी.
तू मला ओढून जवळ घेताच
मिठीतून फुटतात सुखाच्या वाटा
तू घट्ट धरतोस माझा हात हातात
तेव्हा मिटल्या बोटांच्या फटीतून ओघळत जाते माझी लाज.
नुसत्या तुझ्या ओळखीच्या स्पर्शाने
आकुंचन पावतो माझ्या शरीरातला हरेक कोपरा.
सारं शरीरच बोलू लागतं
एका लयीत विश्वव्यापी भाषा.
देहाचंच होतं मंदीर
पहाटे पहाटे भजन गाणारं,
मला पुन्हा पुन्हा नव्याने होत जाते
तुझ्या नि माझ्या शरीराची ओळख.
तुला तर परिचित आहेत
माझ्या शरीरातील प्रत्येक गल्ल्या
अन मलाही तुझ्या.
तू आरूढ होताच
माझ्यात जन्मते समर्पणाची भावना
नि, मी तुझ्यावर स्वार होताच
कुठून तरी येतो माझ्यात करारीपणा.

तप्त भूमीवर जेव्हा निथळतात अमृताचे थेंब
सारं कसं हिरवगारं होतं रान आतून बाहेरून.

तू असाच लपेटून रहा मला.
मला जगून घ्यायचं आहे सारं आयुष्य
याच एका क्षणात...

▲

## एका संध्याकाळी

दिवसभराच्या सरल्या क्षणांची माळ हातात घेऊन
एक एक अस्वस्थ मणी ओढत
मी एकांत बसलो आहे
स्वत:ला चार हात लांब ठेवून.

भिंतीवर लटकलेल्या आईची
खुशाली विचारली मनातल्या मनात
सिगारेट ओढली
पुस्तकांवरची धूळ झटकून
अंगावर उडालेली धुळाक्षरे तशीच ठेवली
बायको ऑफिसहून परतायच्या आत
दोरीवर वाळत घातलेल्या कपड्यांच्या घड्या घातल्या
मोरीत जाऊन मनसोक्त लघवी केली
संध्याकाळ उतरू लागताच
खिडकीत आलो.

खिडकीत दोन्ही हात उंचावून
समोरच्या अथांग जनसमुदायाला संबोधून
फक्कड भाषण ठोकले
टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटामुळे
माणसे अस्पष्ट होत जावून
प्राणी, पशू, पक्षी
धावत सुटले दिशाहीन सैरावैरा
थरथरलेल्या भुईला पडल्या भेगा

प्रकाशाचे रंगीत झोत
जमिनीतून झेपावले आकाशात
नग्न चंद्र, चांदण्या भिजलेल्या
वाऱ्याचाही दिसू लागला जांभूळ निळसर रंग
या सर्व गदारोळात
मी करून घेतली सर्व देवी-देवतांची वैयक्तिक विचारपूस
त्यांच्याकडे पाहिले आशीर्वादासारखे.

दूरवरुन ऐकू आला कुणाच्यातरी रडण्याचा आवाज
दुसरीकडून सामुहिक खिदळण्याचाही
कुणीतरी भिंतीकडे तोंड करून
भिंतीशीच भांडत होता
वेडा समजून लोक शहाण्यासारखे
त्याच्याकडे दुर्लक्ष करून घराकडे परतत होते.

अचानक दारावरची बेल वाजली
खिडकीत दोन्ही हात उंचावलेला मला
मी तेथेच उभा ठेवून
सावकाश दरवाजा उघडला
तर समोर चक्क मीच
शंभर वर्षांचा जख्ख म्हातारा होऊन
आत येण्यासाठी माझ्या परवानगीच्या प्रतीक्षेत...

▲

## नुसतंच भरून येतं

असं भरून येतं आभाळ अवेळी
जशा नवजात कवितेच्या गदगद ओळी
प्रचंड घनतेचा मुका दगड काळजावर
त्यात जीवाची घालमेल येरझारा घालणारी आतल्या आत
घरट्याकडे परतणाऱ्या पाखरांची लगबग
तशी आवराआवर नसलेल्या सामानांची.
कुठवर घालायची आयुष्याला नथ
अन् करायचे बाजारात उभे?
नेमक्या अशा अवसान घातकीवेळी
नुसतंच भरून येतं आभाळ
भिजवत नाही आयुष्याचे वांझोटेपण
शिंपडत नाही उजेडाचं चांदणं
करीत नाही सुटका नरकयोनीतून
अन्यथा माझेही डोंगर वाऱ्यावर झुलू लागतील...

▲

## का? किती? कशासाठी? कुणासाठी?

किती ओढाताण करायची परस्परातील संबंधांची?
किती आदळआपट करायची नात्यांची?
किती गोळा करायची विखुरलेली स्वप्नं?
किती वेळा आवरून सावरून घ्यायचे स्वत:ला?
किती दिवस सारवून घ्यायचा मनाचा कोपरा?
किती काळ लिंपायचे अंधाराचे दार?

का स्वत:ला फसवत मागायचे सज्जनपणाचे दाखले?
का आठवत राहायचा भूतकाळ नव्या रुपात?
कुणासाठी जाळायचे आत्मक्लेशाचे दिवे?
कुणासाठी मोजायचे दोन श्वासांमधील अंतर?
कशासाठी खेळायची नियतीशी कुस्ती?

कुठवर नेसवायची नागड्या वास्तवाला चड्डी?
कुठवर न्यायचे स्वत:ला ओढत मरणाजवळ?
कुठवर करायची मनधरणी न आवडणाऱ्या गोष्टींची?
कुठवर स्वत:ला थोपवून ठेवायचे शांत?
कुठवर कवितेच्या धुंदीत आत्म्याला फासायचे रंग?

हे प्रश्न मलाही पडतात...

पण दोन हात करण्याचे बाळकडू प्याल्याने
मी नेहमीच वाऱ्याकडे तोंड करुन उभा राहतो
जमिनीत पाय घट्ट रोवून...

▲

# दोन चेहेरे मुंबईनगरीचे

मुंबई मला आवडते आणि नावडतेही...
तिच्या चेहेऱ्यावरील अभिजात सौंदर्य
अन जांघेतील गजकर्णासहित...
प्रतिभेला वाव देणारे हे सकारात्मक शहर
जगण्यासाठी अहोरात्र संघर्ष करायला शिकवते आमीर - गरीबाला
जगण्याची ताकद देऊन उभे करते चालायला
आपल्या मस्तीत, धुंदीत, तोऱ्यात डुलणारी
तरी सर्वांना आभाळाचे पंख देणारी ही मुंबई
दाखवते माणसांचे अनेक मुखवटे
आपलेसे करून मोहात पाडणाऱ्या,
माणसाला परिपूर्ण करणाऱ्या
या मायावी नगरीत
वसले आहे बहुरंगी बहुआयामी छोटे जग
आपल्या गुण-दोषांसह.
मुंबई डकवते जीवघेण्या पळापळीत प्रत्येक थोबाडावर नकली हास्य.
इथे घामाच्या वासापेक्षा
कतरीना कैफच्या पादाचा वासही सुगंधीत वाटतो
आणि ऐकूही येतो तृप्त ढेकराचा खरपूस आवाज.
हे शहर कुणालाही खाली पेट झोपू देत नाही.
विविध संस्कृतीचे हंडे येथे भरतात पाणी
वडापावाची चव असते मुंबई
रानटी आणि तितकीच प्रेमळ
सख्खी आई अन सावत्र बापासारखी.
सैल करते जात, धर्म, प्रांताचा पीळ

तर कधी आवळते अविश्वासाची नाडी.
शिकवते लांडीलबाडी करायला
प्रसंगी लढायलाही...
इथे असता तुम्ही वेगळे
पण गर्दीत चेहेरा हरवून होता एक मोठा ठिपका
मोर्चाकडे कानाडोळा करायला शिकवते मुंबई
लढण्याची जिद्दही मनगटात पेरते.
पोटाला अन्न, हाताला काम देणारी ही महानगरी
माणसाला माणसाळवते
सहिष्णु करते चीड
अंतर्मनात चाललेल्या धुडगुसाकडे
दुर्लक्ष करायला भाग पाडते
शिकवते शल्य लपविण्याचे कसब
दुःख पेलायचे क्लासेस घेते मुंबई...
भुकेने पिटाळलेले निर्वासित
दररोज येतात नशीब घासायला खेड्यापाड्यातून
या शहराच्या कचराकुंडीत
जेथे इमारती टेकू लावतात आकाशाला. अन्,
भांबावलेल्या ग्लोबल झोपड्या रुतत जातात पाताळात.
चकाचौंद शहराचा दुखरा भाग वेशीबाहेरील अंधारात चाचपडत असतो.
ज्या हातांनी नटवले हे शहर
ते मागतात भीक आलिशान मॉलबाहेर
अथवा लोकल, फूटपाथ, मंदिर, मसजिद, पंचतारांकित हॉटेलसमोर.
शहर झिंगते रात्रभर पैशाच्या नशेत.
रात्रीला फुटते जवानी
करिअरच्या नावाखाली बापच मुलींना नेऊन सोडतो कसायाच्या उंबऱ्यात

अन मुलांचे बालपण हिसकावून
त्यांना बनवितो जीतेजी प्रौढ.
येथे भगव्या, निळ्या, हिरव्या, रंगांच्या धुमश्चक्रीत
रस्त्यारस्त्यावर खेळली जाते लाल रंगपंचमी
प्रसंगी, डोळे पुसायलाही सरसावतात अनेक रंगांधळे हात
तत्त्वज्ञान घेऊन जगणाऱ्यांची
मुंबई करते नकळत शिकार
अन आपण सावज बनण्याची वाट पहात असतो
प्रेयसीला कविता ऐकवताना
येथे दक्ष असतात सीसीटीव्हीचे डोळे
किंवा संस्कृतीरक्षकांचे दंडुके
तरीही बॉम्बस्फोटाने अधूनमधून हादरतेच मुंबई.
मुंबई आहे एक व्यसन जगण्या- मरण्याचे ...
- माझ्या बापाची 'गारेगार' विकणारी आईसक्रीमची गाडी
नि, आईच्या डोक्यावरील भाजीची जुडी आहे मुंबई.

▲

## श्याना कौवा...

एक श्याना कौवा काल भेटला आपुनको
शॉलीड केलं त्यानं बोलबच्चन.
बोल्ला,
तुजी जिंदगी झ्याट झालीच आहे
तर कशाला वाट लावतोस फ्यामिलीची?
आपुनची तर हटली होती यार
पन लिखे पढ़े लोकांच्या नादी लागनं
एकदम झ्येंगाट अस्ते बावा...
ठोले लोग परवडले
पन श्यान्या लोकांला नको कधी नडायला.
दिमाखची पार मा-भैन करून टाकत्यात...

ऐकच्युली आपुन त्येला करू शकत होतो वन्टास
पन तोपन आपुन जैसाच.
कदी सीधा नाय चाल्ला जिंदगीत
मीडलक्लास लोगांसारखा. अठ्ठन्नीछाप.
तो हमेशा फटीचर लोकांमधिच जगला शिम्पल लाइफ.
फुटपाथवर झोपला.
जात नाही मानली, धरम नाय पाळला.
उसकूच नव्हता जात-धरम, होता खाली इमान.
थोबडा पाहून नव्हता करत दोस्ती यारी.
नंगाफकीर आपुन जैसा.
बकायचा कुच्छुपन समझके बाहर
लोगांला जमा करायचा

‘हकके लिए लढो’ ऐसी करायचा चिल्लमचिल्ली.
जमा पन झालता एक टाईम झोपडपट्टीच्या लोच्यात.
तरीबी नाय सोडली त्याने भुख्या नंग्या लोगांची बात.

आपुनचा बापपन होता खसकु हटेली.
साली उसकीपन जिंदगी एकदम कंडम.
कधी त्येचा भेजात घुसलाच नाय सीधा हिसाब.
हाफ लाईफ काटली त्येने जेल्लात.
झोपडीदादाचीच करून टाकली फुल्टू.
त्या टाईमापासून आपुनची माय आजपन दिमाख खाते बापावरून.

भैनलोगांचा वास्ता देवून सुनावते खालीफोकट
दोन रोटीच्या झमेल्यात सुन लेता आपुन.
तिची पुरी करू शकत नाय मन्नत
धन्दापानी, सर्व्हिस, गधामजुरी नाय आपल्या बसची बात.
चार-पाच गांधीबाबाच्या वास्ते
लाईफची कोन लावून घेनार वाट?
एक तारीखची राह बघत जिंदगी होते हराम...

एक बात आहे बावा-
कोनभी बड़ा आदमी बिना कालाकांडी करून
न पहेनता काला टोपी होत नाही बडा.
इमानदारीची रोटी खाणारे सडतात गटारीतच.
उनकोच बड़ी खाज असते कंट्रीची.
बडे लोग तो रांड जैसा करतात युज नेशनला.
दुनिया झुकवतात इमान कोपच्यात ठेवून.

अल्लाह, भगवान सब पतलीगली कापतात त्येंच्यापुढं कन्नी.
भाईचेपन भाई असतात बड़े लोग.

भंकस नाय करत आपुन
पन कुनी श्यानपत्ती केली, नष्टर दिली
तर सीधा भीड़ जाता हूँ बाप.
करून टाकतो आपून कुणाचीबी
'हटे नई फटे तक'

आरामसे कटत होती आपुनकी लाईफ
पन या श्यान्याने घातला रहेमानी कीडा दिमागमधी.
आपुन तो होतो यार हरफनमौला
कधी केली नाय आढीबाजी
ना पडलो पोलिटिक्सच्या लफड्यामधी.
रेव्होलुशन बिवोलुशन वाटायचे सब झूट.
आपुनचा फंडाच अलग, अतरंगी.
खावो, पिवो, ऐश करो
दुनिया गयी भाड मे.
पन या शान्याच्या वास्ते
उद्या आपुनबी जाणार है बॉस मोर्च्यात...
आपुनको भी सुधारना मंगता है ना भाय?

▲

# तुझा पूर्णाकृती पुतळा

झोपडीपट्टीच्या तोंडावर उभा असलेला
तुझा पूर्णाकृती पुतळा
मॉलच्या काचेरी तावदानातून स्पष्ट दिसतोय.
तू कुठून कुठे आणून ठेवलेस आम्हाला
अन् तू अजूनही आहे तेथेच उभा आहेस
विशिष्ठ जाती-धर्माच्या चबुतऱ्यावर.

ज्यांचे आभाळ ठिपक्याएव्हढे
त्या फाटक्या तुटक्या दळभद्री लोकांची
तू झालास अक्कल दाढ
तू घासलेस त्यांचे नशीब लखलखीत
उजेडाचे हात बनून.
मध्यरात्री असं अचानक उजाडले म्हणून
अंधाराची सवय झालेल्या डोळ्यांना
टोचत राहिले तुझे प्रकाशाचे बोट.
तू नसतानाही असतोस सोबत
अन जगल्यासारखे वाटते.

आम्ही म्हणजे,
नुसताच थयथयाट करणारा षंढ जमाव
अन्यायाविरुद्ध मनात चीड, पण
त्याविरुद्ध झगडण्याचे त्राण नसलेले सजीव कण
ठळक अंधारातच चमकणारे क्षुद्र काजवे.
तुझ्या नुसत्या नामोच्चाराने येत असला

स्वर्गीय सुखाचा पवित्र सुवास तरीही
तुला वडिलोपार्जित स्थावरजंग मालमत्ता समजून
आम्ही पसरू देत नाही ऐसपैस सर्वत्र
तुला खुजे केल्यानंतरच
आम्ही होणार आहोत आमच्यापुरते उंच.
चर्मकार, मातंग, साळी, माळी, तेली, कुणबी
या दु:खाचा तोंडवळा असलेल्यांना
ठेवतो आम्ही तुझ्यापासून जाणीवपूर्वक चार हात लांब
तुला समजून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या
परिघाबाहेरील लोकांच्या निष्ठेकडे
आम्ही पाहतो साशंक नजरेने.
आम्हीही प्राणपणाने जपतो आमच्या जातीची प्रतिष्ठा
तुलाच आमचा देव बनवून वाटून घेतले
आमचे रंग, सण, तिथी अन शब्दकळा.

आम्ही जगाला सांगतो
तुझी जात आणि धर्म ठासून
महार होतास म्हणून
तू आमच्यासाठीच कसा लढलास आयुष्यभर
सैतानाचे हातपाय असलेल्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेला तू दिलेले हादरे
चवदार तळे, काळाराम मंदिर प्रवेश, घटनेचा शिल्पकार,
धम्म दीक्षा
नि, 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा'
यापलीकडे आम्हाला तरी कुठे ठाऊक आहे आंबेडकर?
तुझ्या विचारांच्या रंजक दंतकथा बनवून
आम्ही भावी पिढीला देतो फक्त प्राथमिक धडे

नैतिक श्रेष्ठत्वाची बडबड करणाऱ्यांचा
उघडा पाडत नाही भंपकपणा
केवळ तुझ्या नामाची जपमाळ करून
पार पाडतो सामाजिक कर्तव्य.
परिस्थिती घडविते महामानव जगभरात
हे स्वीकारायला आम्ही नाही तयार
मानतो तू म्हणजे आहेस चमत्कार
महामानवही कधी चुकू शकतो
यावर नाही आमचा विश्वास
तुझा प्रत्येक शब्द असतो प्रमाण आमच्यासाठी.
तुझ्या पुतळ्याची विटंबना असते
अस्तित्व टिकवून ठेवण्याचा आमचा प्राणवायू
ज्वलंत प्रश्नांकडे डोळेझाक करून
आम्ही पेटून उठतो भावनिक प्रश्नांवर
अंतर निर्माण करतो माणसामाणसात दिवसागणिक.

आम्ही सांगत नाही पाण्याच्या समान वाटपासाठी
तू जमिनीची तहान बनलास हे सत्य
समस्त कामगारवर्गाला बहाल केलेस हक्क
महिलांना दिलास बाळंतपणाच्या रजेसोबत
नवऱ्याच्या संपत्तीत वाटा
मतदानाच्या अधिकारासोबत दिलीस प्रत्येकाला
शिक्षणाची सार्वत्रिक हमी
मांडलीस अर्थशास्त्राची नवी समीकरणे
सुटसुटीत केलेस मानवजातीचे जगणे
यातले काही एक सांगत नाही आम्ही.

तुला डोक्यात नव्हे तर डोक्यावर घेणारे तुझे भक्त
कचरतात अनुयायी व्हायला
घाबरतात सामोरे जायला बदलत्या पर्यावरणास
त्यांना दिसत नाही काळानुरूप प्रश्नांचे बदलते स्वरूप
तुझ्या दूरदर्शी विचारांच्या पोथ्या बनवून
ते तुला पुन्हा खेचत नेतात पुराणात
सनातन चतुर युक्तिवाद मांडून.
तुझ्या 'ईझम'ला देत नाहीत नवे परिमाण
त्यांना हवा तितकाच ते स्वीकारतात तुला सोयीनुसार.
चुकांचे वर्तुळ पूर्ण झालेले असतानाही
त्यांना अजून आले नाही समाजसुलभ शहाणपण.

मी अजूनही पाहतो आहे तुझा पुतळा
डबडबलेल्या डोळ्यांनी
पुसट होत चाललेला.

पुतळ्याची मूर्ती होण्यास वेळ लागत नाही...

▲

## मी इतिहासाशी बोलत असतो

आयुष्याच्या संध्याकाळी
ज्यात असते माझ्या बावळेपणाची कथा
अशी कविता
खिडकीत उभे राहून मी काळोखाला ऐकवित राहतो.
माझी अक्षरे माझ्यापेक्षा मोठी मोठी होत जातील
तेव्हा त्यांनाही कळायला हवे की,
खूप कमी वेळा झाला मला सुखाचा स्पर्श
झाली झुळझुळीत स्वप्नांची ओझरती ओळख
काही करायला गेलो की नेमकी जमीन हलायची
प्रयत्न करूनही शेवटची पायरी कधी चढता आली नाही
फक्त स्वप्नातच कुणीतरी लिहायचे माझे संवाद
अन्यथा, मी काळजातूनच बोलायचो
जे कुणाला फारसे रुचत नसे
कौतुक आणि टीका समप्रमाणात नाही मिळाली.
टीकेचे पारडे नेहमीच जमिनीकडे झुकायचे
आयुष्याच्या गुंतवणुकीवर
बनचुकेपणा हाच लाभांश असतो हे कळायला
जगाचे टक्केटोणपे खावे लागले
समस्त जगण्यालाच झाली होती शापाची लागण
माझ्या पिढीच्याच मागे होता
विवंचनेचा कालखंड
टांगलेल्या अवस्थेत सुटकेची प्रतीक्षा करण्यासारखे होते.

आताही काळोखाला कविता ऐकवून
मी सतत इतिहासाशी बोलत असतो.

▲

## मनाचा कोंडवाडा

प्रत्येकालाच हवी असते आपापली स्पेस
जी प्रसंग अन् कालानुसार आकुंचन-प्रसरण पावत असते
पण इथे तर
माणसाभोवती रेघोट्या मारून
त्याच्या विस्तारण्यालाच
ठेवले जाते जखडून
त्याला उगवू दिले जात नाही
वाढवू दिले जात नाही
फुलू दिले जात नाही, बागडू दिले जात नाही,
उडू दिले जात नाही
प्रत्येक दारावर लटकविले  जाते
अविश्वासाचे कुलूप.

हल्ली अजणती मुलेही पाहायला शिकली आहेत संशयाने
खांद्यावर विश्वासाने टाकली मान तरी गळा कापला जाण्याची भीती पेरून
ठेवलीय त्यांच्यात
खंडीभर अफवा पसरविल्या जातात
वर्तमानपत्रे, टीव्ही, वेगवेगळ्या रंगांतील भाषणे
अन् मंदिर-मशिदीतून
मग अलगद बसते भीतीचे अस्वल कुणाच्याही बोकांडी
हल्ली फुलांच्या गोष्टी करायलाही धजावत नाही मन
न जाणो एखाद्या पुष्पगुच्छातून
धाडली असेल कुणी बॉम्बची सदिच्छा
अशी काटेरी धडकी बसतेच उरात.

पिंजऱ्यात अडकलेले पक्षी, प्राणी पाहण्याची
इतकी सवय झाली की
शहरच वाटू लागले आहे अरण्य
मग आपणच उभारू लागतो स्वत:भोवती लोखंडी भिंती
ही तटबंदी सुरक्षिततेची की भीतीची?

भातात खडा लागला तरी त्यात दिसतो
नक्सलवादी, परकीय शक्ती अथवा पाकिस्तानी हात
हे निमित्त साधून
देशाच्या सीमा केल्या जातात कुंपणाने सुरक्षित
माणसा-माणसात उभारली जाते
चीनी भिंत
अन् इतिहासातून सतत दिले जातात
विश्वासघाताचे, रक्तपाताचे दाखले.

उद्या अक्षरांना जायबंदी करून कोंडून ठेवले पुस्तकात
तर कवितेचा आक्रोश घुमणारच नाही का आसमंतात?
जेथे स्मशानभूमीलाही घालतात कुंपण
तेथे मनाचा कोंडवाडा होणारच नाही कशावरून?

▲

## ओसाड गावचा अनभिज्ञ सम्राट

मोडकळीस आलेल्या जीर्ण खुर्चीवर बसलो निवांत
तर डोक्यात एक पाय लोबंकळत राहिला आतल्या आत.
माझ्या पिचलेल्या बापाने आणली होती ही खुर्ची
चोरबाजार अजून आहे
माझा बाप नाही
वारसाहक्काने खुर्ची चालत आली माझ्यापर्यंत
माहित नाही आमच्याआधी
कितीजण बसले असतील तिच्यावर
आणि कितीजण बसणार आहेत यापुढेही

एक मात्र खरे,
पूर्वीच्या वस्तू आणि माणसे तकलादू नव्हती.

या खुर्चीचा एक पाय मोडला असला तरी
हात अजून शाबूत आहेत
न जाणो माझ्यासारख्या कितीजणांना सावरले असेल या हातांनी
खुर्ची बनण्याआधी सावली बनलेले ते झाड
आता नेमके कुठे असेल?
कुणी चोरून नेलं असेल त्याला सावलीसह?
की, उभारलं असेल तेथे दगडमातीचं घरटं?
खोडासह छाटून टाकलं असेल की
त्याची मुळं पसरत चालली असतील भूमिगत?
याच खुर्चीवर बसून कुण्या मास्तराने
दिले असतील जग पाहण्याचे डोळे तुटपुंज्या पगारात

अथवा
भरपेट जेवून झाल्यावर कुणी भिरकावला असेल
आशाळभूत भुकेपुढे लाचारीचा तुकडा
कुणी उधळले असतील हिरवे गांधीजी
मद्यप्राशन करता करता
बारबालांच्या असहाय्यतेवर कुर्बान होऊन
किंवा कुणा शेतकऱ्यांच्या जमिनीचा तुकडा
हिसकावलाही गेला असेल अंगठ्याच्या साक्षीने
अथवा
याच खुर्चीवरून कुणा निरापराध आरोपीला
चढविले असेल सुळावर पुराव्याअभावी
कुणी कायदा आणि सुव्यवस्थेच्या नावाखाली केली असेल सही
नक्षलवाद्यांच्या एनकाऊंटरची
खुर्चीवर बसून किती प्रतिष्ठितांनी मागितली असेल भीक, लाच
(गरीबांचे आयुष्य मात्र खुर्च्या लावण्यातच जाते)
ग्रंथाना खुर्चीत बसवून एका पीठाने दिली असेल धर्माज्ञा
परधर्मातील प्रार्थनास्थळं जाळण्याची
किंवा कुणी लावून दिले असेल भांडण दोन राष्ट्रांमध्ये
कुणी लिहिल्या असतील स्वान्त सुखासाठी कविता
चंद्र, तारे आणि पाने, फुलांच्या
कुणी रचलेही असतील मनसुबे संसदेला धडक देण्याचे.
काही म्हणजे काहीच नाकारता येत नाही...
मी मात्र या खुर्चीत दिसतोय
ओसाड गावचा अनभिज्ञ सम्राट!

▲

## असं का होतं?

प्रत्येकवेळी असं का होतं?
मी चालायला लागलो की ते रस्ते लपवून ठेवतात
आजकाल वैर अगदी सहज विकलं जातंय
अन् अन्यायाविरुद्धचा असंतोष
कुणालाच वाटता येत नाही
सुईच्या अग्रावर मावेल इतकं
सुखही मिळवायचा प्रयत्न केला तरी
हळूहळू आभाळ आवळत आणलं जातं.
आम्ही किती वेळा व्हायचे जगण्याच्या परीक्षेत नापास?
किती वेळा करू द्यायची दुसऱ्याला
आपल्या आयुष्यात ढवळाढवळ?
छाती आपटून किती काळ करायची आदळआपट?
कुठंवर नदी ओहोळ बनून वाहू द्यायची डोळ्यांतून?
प्रत्येकवेळी मनाला कपडे घालून
किती काढायची स्वत:ची दृष्ट?

इथं चांगलं मरण येण्यासाठी मनाप्रमानं जगताही येत नाही
अन् स्वत:सह गर्दीचा विचार करून
रोकडा उभं ठाकलं की
त्यांच्या डोळ्यांनाही नखं फुटतात...
प्रत्येकवेळी असं का होतं?
उत्सवाशिवाय माणसं गोळा होऊ लागली की त्यांना घाम फुटतो...

▲

# माणसं वागू लागतील पशुसारखी

हल्ली माणूस दिसला की
मी आधी त्याचा पार्श्वभाग बघतो
माणसाला पुन्हा शेपूटबिपूट उगवले नाही ना
याची एकवार खात्री करून घेतो.
माणसं वागू लागलीत पशुसारखी...
गाव आणि शहरं बनू लागलीत जंगलं
झाडीझुडपं नसलेल्या जंगलात
श्वापदं हिंडू लागतील दिवसाढवळ्या
अन् कोलदांडा घातलेली माणसं
कन्नी कापू लागतील शेपूट घालून
नाहीतर युद्धाआधी शरणागती पत्करून
हलवत बसू लागलीत आशाळभूत
कुणी दिलाच पाय जाणूनबुजून
तरी कणा मोडून येतात गुडघ्यावर
शेपटी वर करून मस्तवाल माणंस मात्र
हुंदडतात आपापल्या गोठ्यात
मूठभर समज येताच
करतात शब्दांची लुटूपुटूची लढाई
घेतात भागवून ढुंगणाला शेण फासून
बैल म्हणवून घेण्याची खाज
पण जरा कुठे आवाज झाला की
आपापले देव आणि ग्रंथ कवटाळत
दडतात बोळकांड्यात मातीचे गोळे बनून.

- हल्ली माणूस दिसला की मी
आधी माझी शेपटी लपवून ठेवतो...

▲

## मी नाही कुरुप

मी माझ्यापुरता सुंदरच आहे
मी स्वत:ला समजत नाही कुणापेक्षाही कमी
माझ्या आईला मी वाटायचो जगातले सुंदर बाळ
माझ्या आईचा हाच दावा मला आजही करतो बुलंद
तिचा शब्द आहे माझ्यासाठी प्रार्थना
दुनियेच्या लेखी आई होती ओबडधोबड
राब-राब राबून माती झालेली
पण मला दिसायची ती जगातली सगळ्यात सुंदर स्त्री
सुंदर आईचा मी सुंदर मुलगा
तुम्ही तुमची दृष्टी तेव्हढी पुसून घ्या
दृष्टीचा संबंध येतो मेंदूशी
एकदा तपासून घ्या आपापला मेंदू
डाग कपड्यावर पडले तरी चाललात
मनावर आणि चारित्र्यावर पडायला नको
मी आहे तो असा आहे
पुनर्जन्मावर नाही माझा विश्वास
पण मिळालाच तर पुन्हा भगवान निळेचाच मिळावा
याच चेहऱ्यासोबत.
मी खरंच नाही कुरुप तुम्हाला दिसतो तसा
फक्त तुम्ही जिथून पाहता मला
तेथून दिसत असावा मी तुम्हाला हवा तसा
जागा बदला आणि उघड्या डोळ्यांनी पहा
माझ्यासोबत तुम्हाला सर्व सुंदर दिसेल...

▲

## सौंदर्य

माणूस सुंदर असतो म्हणजे नेमके काय?

त्वचेचे चकचकीत आवरण
नाका-डोळ्यांची मोजमापी ठेवण
कर्कटकाने काढलेल्या चेहेऱ्याचे वर्तुळ
गुलाबी रंगाची रंगपंचमी
भुवयांची रेखीव कमान
की ओठांची कमळजुडी?

माणूस सुंदर असतो म्हणजे नेमके काय?

निसर्गाने काढलेल्या सोरटीत नंबर लागल्याचे भाग्य
किती भाग्यवंतांच्या ललाटी?
फुकट मिळालेल्या बक्षिसाची मिजास
आयुष्यभर बिरुदासारखी मिरवून
किती व्हायचे स्वत:वरच खूष?
जे आपण कमावलेलेच नसते
त्याची किती काढायची दृष्ट?

माणूस सुंदर असतो म्हणजे नेमके काय?

प्रत्येकाच्याच धमन्यात प्रवाहते लालभडक रक्त
कातडीखालचे लिबलिबीत मांस
आतड्याचा गुंता आयुष्यासारखा किचकट

डोळ्याच्या आतली आंधळी खोबणं
लुळी पडलेली नि:शब्द जीभ
जठरात कुजलेले कुबट अन्न
मूत्राशयात तुंबलेले दुर्गंधीयुक्त मूत्र
हाडांनी धरून ठेवलेले शरीराचे पडके बांधकाम.

माणूस सुंदर असतो म्हणजे नेमके काय?

कायमचे डोळे मिटताच
शरीरच खाऊ लागते शरीराला
शरीराच्या बागेचे होते गटार
मरणाची दुर्गंधी सुटते तीन दिवसानंतर सर्वदूर
सर्वच मापदंडाला लागतो सुरुंग
अन भिंतीवर लटकत राहतो अश्मयुगीन चेहेरा

खरे तर माणूस सुंदर असतो म्हणजे ...
स्वर्गाहून देखणी असते त्याच्या बुद्धिमत्तेची संपत्ती
शारीरिक सौंदर्यापल्याड उभी असते मनाची समृद्धी
कुरुपतेलाही मिळते स्वत:चे देखणेपण कर्तृत्वाने
पण
त्वचेखालील नागड्या वास्तवाला
नाही भिडता येत प्रत्येकाला हेही तितकेच खरे!

▲

## लखलाभ

एकूण जगण्याचाच आलेला कंटाळा पदरात टाकून
मी आवरण्याचा प्रयत्न करतोय
माझ्या आत्मचरित्राचा फापटपसारा
स्वत:ला शांत करण्यासाठी
मी सोडून देणार आहे स्वत:शीच भांडणं
बंदही करणार आहे दुसऱ्याला समजून घेण्याचे दार
मी वाकलोय कमरेत
दिखाऊ सांत्वनाच्या ओझ्याखाली
भूतकाळाची परवड
सोडत नाही पाठ जेथे जाईल तेथे
माणसांच्या गर्दीत शोधावा लागतो
स्वत:चा पत्ता
खरे तर, मला करता येत नाही स्वत:चे मार्केटिंग
अन्यथा मीही होऊ शकतो एका रात्रीत लोकप्रिय
तरीही मी कुरवाळीत बसणार नाही
याचनेच्या प्रतीक्षेत चिरंजीव दु:ख
मी जोडून घेणार आहे
फाटक्या माणसांशी एकात्म नाते
कधी काळी सुटलेले.

तुमचे जग तुम्हाला लखलाभ...

▲

## शहाणपण

शहाणपण असते देखणे
गोंडस बाळासारखे निष्पाप
किंवा
दात नसलेल्या बुजुर्गासारखे
कोपऱ्यात गुपचुप बसलेले.
मूर्खपणाच्या थयथयाटावर
गालातल्या गालात हसते शहाणपण
उजेडाचा आरसा पुढे करून
अंधारात वाट काढीत जात असते पुढे पुढे
चुकांमधून चुका करीत जाणाऱ्या मूर्खपणाला
शिकवावे लागतात धडे
आयुष्याचे टक्केटोणपे खाऊनच शहाणपणाला येते रंगरूप
शहाणपणाची बाराखडी
शिकविली जात नाही कोणत्याच विद्यापीठात
अन्
आईच्या उदरातून कुणीच धरून येत नाही शहाणपणाची नाळ.
शहाणपण नसते
वारसाहक्काने मिळालेले वडिलोपार्जित
शहाणपण झुकते कैकदा सत्तेपुढे
सहजासहजी विकले जाऊन
करू लागते बिनडोक्याची हमाली
कधी थकते मूर्खांचे बहुमत असलेल्या संसदेत
पैशाच्या तालावरही नाचवले जाते बारबाला समजून
नाही तर बंदुकीचा चाप ओढून कायमचेच केले जाते गप्प.

मूर्खांच्या मदतीने शहाणपणाने जिंकता येते जग.
मूर्खपणाची धिंड काढणाऱ्या शहाणपणाला
डांबून ठेवता येत नाही सर्वकाळ
ते भिंतीला टकरा मारुन रक्तबंबाळ होण्याऐवजी
भिंत भेदून सहीसलामत बाहेर पडण्याचे मनसुबे आखते शांतपणे.

शहाणपणाला नसते वय
पण ते येईपर्यंत आयुष्य संपून गेलेले असते ...

▲

## सगळ्यांनाच होतो विटाळ

मी उगाचच विसंबून राहिलो स्वत:वर
आपले आपले म्हणणाऱ्या जवळच्यांनी झिडकारेपर्यंत.
निवांत कोपऱ्यात बसून घालवावे आयुष्य
असा आगंतुक विचार येतो कैकदा. पण,
माणसांच्या लोभापायी मी
हयातभर चुकाच करीत आलो आहे.
संबंधांना कितीही लावले अस्तर
तरी सुटतेच दुर्गंधी गैरसमजुतीची.
स्वत:ला गहाण ठेवून बुडीत निघालेल्या आयुष्यावर
आणली जाते टाच
भोंगळ कल्पना स्वीकारून गाभुळते दु:ख
पसरतो तवंग अश्रूंचा थरथरणाऱ्या उजेडात
भंजाळलेलं मन कंठघोष करते आतल्याआत
गंजत चाललेल्या संबंधावर लावायला मिळत नाही कानस
मग निथळत्या चांदण्यात काळीज हलके करताना
आठवतात एकमेकांचे मिणमिणते डोळे
पण, भान आल्यानंतर टळून गेलेली असते वेळ.
प्रत्येकवेळी आपसूक लागतेच ठेच
कितीही सावधगिरी बाळगूनही.
आभाळाचं आकाश होऊ पाहणाऱ्या माझ्यासारख्यांचा
सगळ्यांनाच होतो विटाळ
आता;
घरंदाज मिरवणं झुगारून
मीही माझ्यापरीनं सोपं करून घेतो आहे क्लिष्ट जगणं...

▲

# सुखकर्ता! दुखहर्ता!

सालाबादप्रमाणे
दरसाल दरशेकडा विघ्नहर्त्याची मूर्ती विकणाऱ्या कारखान्यात गेलो
प्रतिष्ठापना करण्यासाठी गणराजाची माझ्या दहा बाय दहाच्या खोलीत.
हरेक रंगातील, आकारातील गजराज विराजमान होते ओळीने
नव्या निवाऱ्याच्या प्रतीक्षेत.
गणपती बाप्पा
हालत नव्हता, बोलत नव्हता, चालत नव्हता
बाजारात निरखून, पारखून पहाव्यात वस्तू
तसे भक्तगण विकत घेत होते वक्रतुंड
प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर होती महागाईची झळ
अन् डोळ्यात भविष्याचे अंधुक स्वप्न
मरणाच्या महागाईच्या दिवसात
सहजासहजी पोहोचत नाही हात तोंडापर्यंत
'पूर्वापार चालत आल्यामुळे करावे लागते' असे म्हणत अनेकजण
बाप्पाची किंमत आणि खिशातील ऐपत
याचा ताळमेळ बसवत होते मनातल्या मनात
मीही मनातल्या मनात करीत होतो विचार
लालबागच्या सेलिब्रिटी 'राजा'चा
सलमान, करीना, राखी सावंतच्या प्रायोजित दर्शनाने
वाढत चालली गर्दी तेथे, की,
सोने-नाणे, हिरे-माणके आणि नोटांचे मोजमाप करण्याचे फोटो
प्रसारित केले जातात योजनाबद्ध. की,
शपथेवर आख्यायिका सांगून पिकविल्या जातात कंड्या
काहीच कळत नाही या अचानक लोकप्रियतेचे गणित.

आमच्यापाठी लागलेले प्रश्नांचे शुक्लकाष्ठ
सुटता सुटत नाही.
श्रद्धेचा बाजार, दुर्जनांची सरशी
अन् पापभिरूंची वाताहात पाहण्यातच जिंदगी गेली.

तरीही न चुकता मी बसवतो गणपती प्रत्येक वर्षी भक्तिभावाने.
माझ्या दु:खाचे तारण मूर्तीत शोधत
काळजापाशी कवटाळत मी आणतो मूर्ती वाजत गाजत
कार्ल मार्क्स, लेनीन, बाबासाहेबांची पुस्तके हटवून
तयार केलेल्या जागेत आरास मांडून,
मी करतो ओंकाराची स्थापना
त्यावेळी
माझा मुलगा अपडेट करीत असतो स्टेटस फेसबूकवर
Enjoying elephant god in our house!

▲

## पाच तुकडे : प्रार्थनेचे

देव पाहिलेला माणूस
कुणीही असू शकतो
बुद्ध / मार्क्स / गाडगेबाबा /
आंबेडकर / गांधी / मदर तेरेसा /
अथवा
रावण / हिटलर / लादेन /
दाऊद / आसारामबापू /
किंवा
सनी लियोनही.
नाही तरी,
परमेश्वर चराचरात असतोच ना?

हगतानाही
देवाचं नाव घेतलं
तरी ते
प्रार्थना म्हटल्यासारखं वाटतं.
अन्
मग
उगाचच
पिकलेल्या गळवासारखं
खूप खूप हळवं व्हायला होतं.

खोटं
खरं वाटावं म्हणून
मी
देवाची खोटी शपथ घेतली.
तर,
देव अजूनही जिवंत आहे
प्रत्येकाच्या मनात.
अन्
मी
खोटं बोलूनही
खरा ठरलो!

माणसं देवाला आंघोळ घालतात
कपडे घालतात
खाऊपिऊ घालतात
भूत मात्र पोरकंच राहतं.

भीती बनून देव हृदयात
अन् भुतं मनात वास करून राहतात.

जोपर्यंत माणूस जिवंत असेल भूतलावर
तोपर्यंत
देवाला आणि भुताला मरण नाही!

▲

## न सुटलेल्या प्रश्नांचे लटांबर

खिजगणतीतही जो गणला जात नाही तो मी
घाऊक आशीर्वादावर तगतो आहे आजतागायत
स्वत:ची बॅग दुसऱ्यानं सांभाळण्याइतकं मोठ्ठं नशीब नाहीये माझ्याकडं
अन् लांडीलबाडी करण्याचं धैर्य,अन् कौशल्य
नाहीच मुळी रक्तात भिनलेलं
काही डेअरिंग करायची म्हटलं तरी
गोट्या कपाळात जातात.

कुणीतरी आपली पाठ खाजवल्यानंतर मिळतं
त्यालाच अलौकिक बिलौकिक सुख समजत आलो.
लहान माणसांच्या अपेक्षाही लहान असतात
नि मोठी स्वप्नं पहायची तर हातभर फाटते.
कितीही लांब केले तरी
हात पोहचत नाही कशालाच
आकाश तर खूप दूरची गोष्ट आहे.

हल्ली समाधानाचा नुसता ढेकर दिला तरी
माझ्याविरुद्ध संशयाचे डोंगर हलू लागतात
भुतांच्या सावल्या गडद होत जातात अवतीभवती
थोराड भुक आणि जड जड
विचार येऊ लागले की
भोगून झालेल्या आयुष्याचा गुंता सोडवत बसायचं
इतकंच हाती उरलंय.

जगण्याच्या भुकेला किती थोपटायची पाठ?
आयुष्याशी झुंजण्यासाठी कशी बांधायची गाठ?
न सुटलेल्या प्रश्नांचे लटांबर घेऊन कुठंवर करायची भागदौड?
कल्पांतापर्यंत
की
समाज बदलेपर्यंत?

▲

## माझाही बाप

“फादर्स डे” च्या दिवशी अचानक बापाची आठवण झाली
रोजच्या धावपळीत
आईप्रमाणे बाप कधी
जगण्याच्या पसाऱ्यात आठवणीतून पुसट होत गेला
कळलेच नाही
कळलेच नाही आपण कधी बाप झालो ते.
आता मी माझ्या बापाहून
फक्त आठ-दहा वर्षांनेच लहान आहे.
माझा बाप नव्हता स्वातंत्र्यसैनिक,
नव्हता समाजसुधारक
नव्हता कवी, लेखक, विचारवंत
होता फक्त गुण-दोषासह
ओतप्रोत भरलेला मानवी देह.
शाळेची पायरी कधी न चढलेला बाप
“गारेगार”आईस्क्रीमची गाडी उन्हातान्हात ओढताना
सिनेमाची पोस्टर्स पहात शिकला बाराखडी एकलव्य होऊन
आम्हा बहिण-भावंडांना दिले त्याने उच्च शिक्षण
बाबासाहेबांच्या लज्जेखातर
नदीत फेकून दिले घरातील देव अन रस्त्यावरील शेंदरी पत्थर
बायको आणि दारू हेच मनोरंजनाचे साधन असलेल्या बापाला
गाव आणि मुंबई
या पालिकडेही असते जग हे नव्हते ठाऊक
त्यामुळेच त्याने घातला आठ मुलांना जन्म
आईला ठेवले चूल-मूल-डोक्यावरील भाजीची पाटी यात व्यस्त

रात्रीव्यतिरिक्त मी आई-बाबांना पाहिले नाही कधी एकत्र
नेहमी सुटे सुटे आणि दिसायचे कायम उभे.
मोठी स्वप्ने पाहण्याचे डोळे नव्हते बापाकडे
तो माझ्याकडे पहात पहातच म्हातारा होत गेला.
बाप माझा दुसऱ्यांकडून वदवून घ्यायचा माझे मोठेपण
तेव्हा चमकायची त्याच्या डोळ्यात चांदणी
माझ्या कवी अन पत्रकारपणाच्या दोन झुली
अंगावर पांघरून बागडायचा झोपडपट्टीत, गुत्त्यात.
कवितेखाली यायचे "भगवान निळे" असे नाव
तेव्हा व्हायचा खटटू गोड चिंचेसारखा
"सगाजी" नावही यावे छापून असे वाटायचे त्याला.
रेशनकार्डावरच छापलेले स्वत:चे नाव पाहण्यात त्याने घालविले आयुष्य.
"मला मुंबईत मरायचे नाही"
असे सांगून बाप गेला गावी
बाप मेला तेव्हा मी नव्हतो त्याच्या आसपास
तरीही
त्याचे घातले असते श्राद्ध तर
अनेक कावळे आले असते शिवायला
कारण तो माझा बाप होता...

▲

## आई गेल्यानंतर

माझी आई गेली तेव्हा मी रडलो नाही
सोसण्याच्या पर्वातून तिची सुटका झाली म्हणून
न रडता मी मोकळा झालो.
इतरांसारखीच माझी आई होती आई
पाखरांना पंखाखाली घेणारी
नवऱ्याची हुकूमत बिनबोभाट स्वीकारणारी
डागाळलेल्या अल्पजीवी स्वातंत्र्यात सुख मानणारी
आनंदी राहण्याच्या ढोंगामागे दडलेली
'नाही' म्हणण्याचा हक्क गमावून बसलेली
लग्न होताच रात्रीतून 'बाई' झालेली
नवरा अन मुलांमध्ये डोलकाठी झालेली.
तिने घेतले होते अपयश काळ्याकुट्ट वस्त्राप्रमाणे
आयुष्यभर लपेटून
वाळवंटातही जत्रा भरविण्याचे सामर्थ्य असलेल्या आईने
बंद केल्या होत्या अभिव्यक्तीच्या सर्व खिडक्या.
सन्मान नि आदराची मूठभर चैत्रपालवी
तिला कधी लाभलीच नाही,
आपल्या जगण्याला तिने दिले होते दैवाचे नाव
ज्या देवावर तिने ठेवला होता डोळे झाकून विश्वास
त्यानेच हगून ठेवले होते तिच्या नशिबावर.
तिच्या माथ्यावर होते
देवाच्या आकाराचे लाल भोक.
माझी आई कधीच जगली नाही स्वत:च्या मस्तीतलं जगणं
ज्या ज्या वेळी ती नकार द्यायला खोवायची पदर

सर्वच करीत राहिले तिच्या कष्टाचे उदात्तीकरण
तिच्या सहनशीलतेचा उदो उदो
तिला दिले धडे संस्कृतीचे, रूढी, परंपरा आणि पावित्र्याचे
तिच्या त्यागाला बसविले काळाच्या कोंदणात
सन्मानित केल्या तिच्या जखमा
ठसविले मनावर दु:ख सनातन असल्याचे असत्य
तिला कधीच येऊ दिले नाही डोळस भान.
एक मात्र नक्की -
आई गेल्यानंतर
तिचा प्रवास सुरु झाला असेल अंधारातून प्रकाशाकडे...

▲

# माझ्या छबुकल्या डड्डा...

देशात धर्मांध जातीवाद्यांचा विजय होत असतानाच
तू जन्माला आलास
भयग्रस्त भूतकाळ घेऊन
तुझ्यासाठी मी जोपासून ठेवली नाही
रंगीबेरंगी स्वप्नांची बेगडी फुलबाग
आपला असह्य इतिहासच
काट्याकुट्यातून वाट काढीत आलाय तुझ्यापर्यंत.
डड्डा,
तू जन्मलास नि,
आनंदानं हुरळून जाण्याऐवजी
मी भितीनेच गारठून गेलो सर्वार्थाने.
फटाके फोडून मी साजराही करू शकलो नाही
आनंदोत्सव तुझ्या जन्माचा.
सारं शहरच कस हादरून गेलंय बघ
कत्तली, जाळपोळ, बॉम्बस्फोटांनी.
प्रत्येकाच्याच डोळ्यात
अविश्वासाची सळसळती नागीण
नि, दातखीळ बसविणारी दहशत
हातात विनाशाचे सुरे
अन डोळ्यात अविवेकी उद्रेक.
इथे माणूसच माणसाविरुद्ध उठलाय
नपुंसक ईप्सितासाठी.
मशिदीतील बांग
नि,

मंदिरातील आरत्यांच्या कोलाहलात
कुणालाच कसा ऐकू येत नाही
तडफडणाऱ्या भुकेचा आवाज?
तुझे बोबडे बोल ऐकण्यासाठी
मी माझे कान नि काळीज
शाबूत तरी कसे ठेवू?

डड्डा,
हा माझ्या एकट्याचाच नाही
आमच्या समस्त पिढीचाच आक्रोश आहे
रक्तामांसाचा चिखल तुडविताना
कुणाच्याच सद्सद्विवेकबुद्धीला
फुटत नाही माणुसकीचा पान्हा
आम्ही अजूनही
रक्ताची जात अन् धर्म शोधण्यातच मश्गुल आहोत.
आम्हाला आवडतं
कुणाच्याही तालावर नाचणं
परस्परांमध्ये भिंती आखून घेणं
दगडामातीच्या देवादिकांसाठी
हाडामासांच्या माणसांचा कोथळा बाहेर काढणं
आधुनिकतेकडून पुराणाकडे चाललेला
आमचा हा अधोगतीचा दिशाशून्य प्रवास थोपवून
तू दाखवशील का आम्हाला प्रकाशाचे दार?

शेवटी इतकंच;
माझी म्हातारपणातली काठी म्हणून

मी पहात नाही तुझ्याकडे आशाळभूत
मला फक्त तुझ्यात
पेटवायची आहे संघर्षाची वात
माणसाला माणसात आणण्यासाठी

म्हणूनच -
तू भरभर मोठा हो!
खूप खूप मोठा हो!
माणूस हो!

▲

## आणि डड्डा

या अफाट जगात मी तुला आणून सोडलं आहे तुझ्या इच्छेशिवाय
जसं माझ्या आई-वडिलांनी मला
अन् त्यांच्या आई-वडिलांनी त्यांना

आता तुझं तुलाच झगडावं लागेल प्रचंड
सर्व जगाशी नि, स्वत:शीही
स्वत:चं अस्तित्व टिकविण्यासाठी पावला-पावलावर.
इथं लढणाऱ्याला मिळतो हक्क/अधिकार
अन् सहन करणाऱ्यांना बुक्क्यांचा मार.
तसं तुलाही जगता येईल आशाळभूत आश्रितासारखं
मेहरबानीखातर 'हाजी हाजी' करून... नाही असं नाही
पण तू
या नरपशुंच्या अंधारगुहेत
तीळ-तीळ मरणार नाहीस प्रेषिताची प्रतीक्षा करीत
याची मला खात्री आहे.

डड्डा,
तू करू नकोस भौतिक सुखाच्या हव्यासापोटी
माणुसकीच्या नावानं चांगभलं
उभाही राहू नकोस
लाचार षंढांच्या रांगेत सगळीच उमेद म्यान करून
गाजवूही नकोस हुकूमत
नि:शस्त्र रयतेच्या मनावर
तू नेहमीच

शत्रूंच्या विरोधात मित्रांच्या बाजूने उभा रहा
तत्पूर्वी मित्राचा मुखवटा डकवून येणाऱ्या
शत्रूला नेमकं हेरण्याचं शास्त्र तुला शिकावं लागेल.

आणि हो,
विषमतेच्या या मायावी दुनियेत
सर्वस्व गमावलेला तू एकटाच नाहीस याचं भान ठेव
तुझ्यासारखे रणात झुंजणारे जखमी योद्धे
आपापल्या परीने या अंधारयुगाशी झुंजत असणार
याचंही भान ठेव

खरं तर
इथून तिथून माणूस सगळा सारखाच असतो डड्डा
असतो तो फक्त पिळणारा अन् पिळला जाणारा
तू मात्र नाडकऱ्यांची सोबत करू नकोस
उलट त्यांच्या विरोधात उभे ठाकलेल्यांचा
तू रंग पाहू नकोस
अन् पाहूही नकोस त्यांची जात, धर्म, वंश, प्रांत
कारण-
तू जो श्वास घेत आहेस
तोच श्वास ते घेतात
तुला जी सृष्टी दिसते
तीच त्यांनाही दिसते
तुझी जी दु:ख असतील
तीच त्यांचीही असतील
तुझ्याच रक्ताचा रंग नाहीये लाल

त्यांच्याही धमन्या-धमन्यांमध्ये सळसळत असेल आग
ऊन/ वारा/ पाऊस/ नद्या-नाले/ डोंगर/ दऱ्या,
कडे-कपारी/ झाडे/ पक्षी/ फळं/ फुलं/
समुद्र/ फुलपाखरं अन् ही जमीन
या सगळ्यांवर सगळ्यांचाच समान हक्क आहे.
संपूर्ण सृष्टीच निसर्गनिर्मित असून
निसर्ग कधीच करीत नाही दुजाभाव
हे सर्व जगाला पटवून सांग.
अन् सांग
लाखो पोरंबाळं कुपोषणानं मरत असताना
मानवनिर्मित मूर्त्यांना दूध पाजणाऱ्या गांधारी जनतेला
विज्ञाननिष्ठ परिमाण.

आणि डड्डा.
माझ्याप्रमाणे जेव्हा तू सुद्धा या जगात नसशील तेव्हा
अशी कविता लिहिणं कोणत्याही पित्याला भाग पडणार नाही
असं स्वच्छ, निर्मळ, पवित्र जग निर्माण झालेलं असेल.
अन्
या नव्या जगाचा नवा कोरा इतिहास
तुझ्याच हातानं लिहिला गेलेला असेल
याची मला हमी दे
खात्री दे
निदान;
मला मरण तरी सुखाचं येईल!

▲

## माझ्या मुलीच्या समजुतीखातर...

सृष्टी बेटा,
तुला नाही पाजली तुझ्या आईने दुधातून
नीतिमत्ता अन रूढी परंपरा वाहण्याची बाळगुटी
पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व कायम ठेवण्यासाठी
आम्ही केले नाही तुला तुझ्यातच गुलाम.
खरे तर,
आपण ज्या समाजात राहतो
तेथे शिकविले जाते महिलांना पुरुषांचे आश्रित व्हायला सदासर्वदा.
समज येताच समजावून सांगितली जाते
अशक्त असल्याची बाराखडी
शारीरिक कमजोरी गृहीत धरून.
मग हळूहळू ती मनानेही होत जाते अशक्त
अन शिकते पुरुषांच्या आधाराने जगायला.
बाहेरचेच नाही तर घरातले पुरुषही
आयुष्यभर गृहीत धरून चालू लागतात हा पदर
नि, अबाधित ठेवतात आपले वर्चस्व कायम.
बेटा,
पुरुषांची सोंदर्य, बुद्धी, देहाची प्रशंसक दृष्टी
हळूहळू बनत जाते हिंसक
यासाठी बायकांना पावलोपावली
सादर करावे लागते प्रमाणपत्र
आपल्या प्रतिभा, कार्यकुशलता, तत्परतेचे.
नोकरीसाठी घराबाहेर पडताना
त्यांना शिकविले जाते
अधिक कार्यक्षम होण्यास

डोळ्यात अविश्वासाची नजर ठेवण्यास
पुरुषांपासून सदैव सावध राहण्यास
मात्र, त्यांच्यापासून दडविली जातात
आत्मविश्वास आणि संघर्षक्षमतेची हत्यारे बालपणापासूनच
बनविले जाते त्यांना शोभेची जिवंत वस्तू
देह अन सौंदर्याच्या मालकीसोबत
बायका करू शकतात विचार, वादविवादही
पण त्यांच्या बुद्धी आणि विचारांना
नेहमीच लेखले जाते कमी.
जी स्त्री द्यायला शिकते नकार
भौतिक सुखाकडे पाठ करून,
आपली ओळख बनवू पाहते
बुद्धीचे सामर्थ्य जाणून,
अन धजावते संघर्ष करायला
तिच्या रक्तात घोळविले जाते
प्रतिष्ठा, आत्मगौरव, सामाजिक स्वीकृती यापेक्षा
चांगली पत्नी, चांगली आई, चांगली बहिण बनण्याचे बाळकडू
बायकांना हवे असते पुरूषी संरक्षण
अन मुक्ती एकाचवेळी
जी अशक्य असते.
तू मात्र,
लक्षात ठेव बेटा
आक्रोशाने काठोकाठ भरलेल्या या दुनियेत
मी नसेन, तेव्हा तू
प्रेम, सुख, आश्चर्य आणि आनंद वाटायला बाहेर पड...

▲

## मुलगी मोठी होते तेव्हा...

माझी मुलगी आता
मोठी मोठी होत चालली आहे.

आता ती
आरशात स्वत:ला न्याहळत बसते
आरशाशी बोलल्यासारखं करते
माझ्या पुढ्यात बसतानाही सावरून बसते
देत नाही दिलखुलास टाळी
टाळी देताना आखुड होतो तिचा हात
बापाच्या कुशीत निर्धास्त झोपत नाही
झोपेतही सावध असते
कदाचित तिच्यातील स्त्री
ठेवू पहात असावी चार हाताचे अंतर पुरुषापासून
अघळपघळ वागायलाही तिने आता
घातला आहे आईसारखा लगाम

तिला पडतात अनेक प्रश्न
पण ती आता विचारत नाही सर्वच प्रश्न
माझ्यापासून दडवून ठेवते
मासिक पाळीमुळे होणारा त्रास
वेदनेकडेही सांशक नजरेने पाहते
आंघोळीला जाताना
न चुकता लावून घेते हॉलचा पडदा.

माझीच मुलगी असली तरीही
मलाही थेट पहाणे जमत नाही
तिच्या शरीराच्या बदलत्या आकारांकडे
चुकून गेलीच माझी नजर
तर मलाच वाटते माझी लाज
अन तीही संकोचते
टीव्हीवर प्रणयदृश्य येताच
आम्ही चुकवतो एकमेकांच्या नजरा
तिला कपडे तंग होऊ लागताच
माझी वाढत जाते अनाहुत भीती
हल्ली
माझी मुलगी कधीच होऊ नये मोठी
असं सारखं वाटत राहतं
मला तिचा गोड पापा घेऊन
खेळायचे आहे घोडा घोडा
भरवायचा आहे मऊ मऊ भाताचा घास
न्हाऊ घालायचे आहे
थोपटून झोपवायचे आहे
तिच्या मिटल्या डोळ्यात पहायची आहेत
भिरभिरणारी रंगीबेरंगी फुलपाखरं
भरायची आहे तिच्या हृदयातील माझी रिकामी जागा
प्रस्थापित करायचे आहेत पुन्हा
पडदा नसलेले संबंध

मला समजून घेण्यासाठी तिने पुन्हा एकदा व्हावे बाळ...

▲

# मी मी झालो

ज्या वयात जे करायचे असते
ते सर्व काही केले
विटी-दांडू, लगोऱ्या खेळलो
नदीत मनसोक्त तुडुंबलो
हाणा-माऱ्या केल्या
गुरुजींचा मार खाल्ला
पोटापुरता अभ्यास केला पास होत गेलो
आई-वडिलांशी खोटे बोललो
कॉलेज बदलले
विद्यार्थी चळवळीत वळवळ केली
प्राध्यापक व्हायचे सोडून अपघाताने पत्रकार बनलो
मनात गुलाबी लाटा उठताच
आपल्या 'जगन्नाथी' हातावर विसंबलो
अनेक मुलींवर लाईन मारली
एकाच वेळी तीन गर्लफ्रेंड फिरवल्या.
त्यातूनच असहाय्य महिलेकडे संधी नव्हे तर
जबाबदारी म्हणून पहायला शिकलो
लग्न करताच निसर्गनियमाने मुले झाली
हवी तेव्हा दांडी मारुन घरी टीव्ही पाहिला
बीपी पाहिल्या
कविता लिहिल्या,
मान्यवरांच्या रांगेत रांगलो, भाषणे हाणली
कर्ज काढून स्कूटर घेतली,
झोपडे विकून फ्लॅटचे कर्ज फेडत बसलो

आई-वडिल, लहान भाऊ आणि बहिणीच्या पार्थिवाला अग्नि दिला
अनेकदा अंगणात अपमानाला निमंत्रण दिल्याने
त्रास झाला... नाही असे नाही
सांडलेला धीर गोळा करण्यातही बराच वेळ गेला
माणसांचा गोतावळा आजूबाजूला ठेवायच्या सवयीमुळे
अधिकाधिक हिरवा आणि अश्वत्थामा बनत गेलो.
मनाचा उंच डोलारा सतत हलत राहिला...
ज्या वयात जे करायचे ते केल्याने
मला होता आले नाही
बुद्ध, शिवाजी, फुले, आंबेडकर
टाटा-बिर्ला, अंबानी, तेंडुलकर.

- मी मी झालो हेही नसे थोडके!

▲

## मरणाआधीची प्रेतयात्रा

वाचता वाचता अशीच अचानक झोप लागते
पोटावर पुस्तक ठेवून भलत्या सलत्या क्षणी
काचेरी डोळे मात्र अजूनही धरून आहेत नाकाला
श्वासही अजून चालू आहे
पणतीत थरथरणाऱ्या वातीसारखा
प्रकाशाला लागणारच आहे कडी पुढे मागे
तेल संपल्यावर
निदान तोपर्यंत शमला आहे आजूबाजूला कोलाहल
कधी काळी जपून ठेवलेली शांतता
थोपटून थकली आहे अंतरात्म्याला
माझ्या अस्ताव्यस्त जगण्याला हसणारा
नाक मुरडणारा भूतकाळ छळतो आहे झोपेतही
खंतावते घरंगळत गेलेलं निरागस बालपण
तरीही, मांडी घालून बसलेल्या प्रश्नांच्या भाऊगर्दीतही
सुंदर दिसतेय उतारवयातील कोवळे देखणेपण
जगण्याची ही कुतरओढ
अंगवळणी पडत चालली असतानाच
नेमक्या याचवेळी
पडतेय पुस्तकातील प्रत्येक अक्षर फूल बनून
माझ्या मुर्दाड निद्रिस्त देहावर.
मरणाआधीच्या प्रेतयात्रेतही
जगाचा चेहेरा भेसूरच दिसतो गाढ झोपेतही...

▲

# मरणाचा शेवट

जगणे हा अपवाद आहे असे समजून
मरणाला एकटे पाडण्याच्या प्रयत्नात दिवस उलटत चाललेत...

पिढ्या न् पिढ्या तेच प्रश्न, तीच उत्तरे
काना, मात्रा, वेलांटीचाही फरक नसलेल्या प्रश्नांमधून होत नाही सुटका
त्यातच पडेनासे झाले आहेत नवे प्रश्नही
ऐन मोसमात आयुष्याची झालेली पतझड, हेळसांड,
व्यंजनाशिवाय उमटलेले स्वर,
शरीराचा विचार न करता जोडलेले नाते
ठेवलेले संबंध, अन्
प्रेमातून निर्माण झालेली शोकांतिका,
चेहेऱ्यावरून संदर्भग्रंथ वाचण्याच्या जन्मजात खोडीमुळे
दुरावलेली, सावल्या लांबत चाललेली माणसे.

स्वाभाविकपणे स्वत:ला व्यक्त करता करता
एकूण जगण्याचाच पसारा मांडून ठेवलेला असताना
माझ्या पार्थिवावर होतील का जमा उजेडाचे ढग?
कुणी टाकेल का माझ्या डोळ्यात चिमूटभर चांदण्याची पूड?

माझ्या मरणाचा तरी होईल का गोड शेवट?

▲

## मी मरेन तेव्हा...

मी मरेन तेव्हा
माझ्या नावावर असेल मुख्यमंत्री कोट्यातून मिळालेला फ्लॅट
माझे रिकामे असलेले बँक बुक, क्रेडिट कार्ड
पुस्तकांनी भरलेली कपाटे
नुकतीच लिहिलेली एखाद दुसरी अप्रकाशित कविता
काही मेडल्स
कोपऱ्यात पडून राहिलेली सिगारेटची थोटके
माझे जुने पुराणे फोटो
माझ्या वापरातल्या वस्तू
भिंतीवर लटकलेला उसने हसू आणलेला फोटो
माझी दोन गोजिरवाणी मुले
मुलांसाठी काही करून ठेवले नाही म्हणून आदळआपट करणारी बायको
माझे असंख्य जिगरी यार, दोस्त, मैत्रिणी आणि
अनादि काळापासून चालत आलेली ही पृथ्वी, हे ब्रह्मांड.

मी मेल्यानंतर तसूभरही फरक पडणार नाही जीवनचक्रात
हे रहाटगाडगे असेच चालू राहील बिनबोभाट
माझ्या संदर्भातील कडू-गोड आठवणीही पुसून जातील काळाच्या ओघात
हळूहळू मी पुसला जाईन प्रत्येकाच्या स्मृतीतून
माझ्या सज्जनपणाच्या शपथा घेणारे माझे यार दोस्त
अन एक चूक कायम लक्षात ठेवून माझ्या संपूर्ण जगण्याचे पोस्टमार्टम
करणारे 'हितचिंतक'
यांच्या मोबाईलच्या फ्रेंडलिस्टमधूनही.

‘बावळट आणि फाटका होता पण माणूस म्हणून बरा होता’
इतके मात्र निश्चित म्हणतील सर्वजण.

मी मरेन तेव्हा
एका क्षणात सर्वानुमते नामकरण होऊन
भगवान निळेचे नाव ‘बॉडी’ झालेले असेल...

▲